पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६२ ■ शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# ड्रग्ज प्रकरणात एकनाथ शिंदेंवर होणारे आरोप चुकीचे; मुख्यमंत्र्यांची क्लीनचिट

## न्यायव्यवस्थेवर कुरघोडी करू नका, ठाकरे गटाचा टोला

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**मुंबई:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातारा ड्रग्ज प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर होणारे आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत. प्रस्तुत प्रकरणात आतापर्यंत हाती लागलेल्या पुराव्यांमध्ये एकनाथ शिंदे किंवा त्यांच्या कुटुंबाचा कोणताही संबंध दुरान्वयेही आढळला नाही. त्यामुळे त्यांच्यावर होणारे आरोप चुकीचे व निषेधार्ह आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाने मुख्यमंत्र्यांना एकनाथ शिंदेंना क्लीनचिट देण्याचा कोणताही अधिकार नसल्याचा आरोप करत त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. न्यायव्यवस्थेचा आदर राखा, कोण चूक कोण बरोबर ठरवू नका, ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, सर्वप्रथम मी पोलिस विभागाचे अभिनंदन करतो. त्यांनी त्या ठिकाणी सुरू असलेल्या धंद्याचा पर्दाफाश केला. त्याच्यावर मोठी कारवाई केली. या संपूर्ण प्रकरणात जाणिवपूर्वक राजकीयदृष्ट्या कुठेतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

तो चुकीचा आहे. तो निषेधार्ह आहे. या प्रकरणात आतापर्यंत हाती लागलेल्या पुराव्यांमध्ये त्यांचा किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणताही संबंध दुरान्वयेही आला नाही. त्यामुळे मला असे वाटते की, कुठेतरी दिशाभूल करून अशा पद्धतीने संबंध जोडणे योग्य नाही. यासंदर्भात सरकार पूर्ण चौकशी करत आहे.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी मुंबई महापालिकेतील शिवसेना - भाजप युतीचे जागावाटप योग्यपणे सुरू असल्याचेही स्पष्ट केले. महायुतीचे जागावाटप चांगल्या पद्धतीने सुरू आहे.

आमचे दोन्हीकडले नेते नीट महायुतीचे जागावाटप करत आहेत. हे जागावाटप २ दिवसांत पूर्ण होईल असे वाटते, असे ते म्हणाले. दूसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सातारा ड्रग्ज प्रकरणात एकनाथ शिंदेंना क्लीनचिट देण्याच्या मुद्यावर जोरदार आक्षेप घेतला आहे. त्या म्हणाल्या, माननीय मुख्यमंत्र्यांनी आज माध्यमांना बोलताना उपमुख्यमंत्र्यांना क्लीन चीट देण्याचा पुन्हा एकदा धाडसी प्रयत्न केला आहे. ( आपल्याला त्यांची खरेच किती काळजी आहे हे मी पुन्हा कधीतरी स्पष्ट करेल). तूर्तास माझी मुख्यमंत्र्यांना पुन्हा एकदा विनंती आहे, कृपया न्यायव्यवस्थेचा आदर राखा. कोण चूक कोण बरोबर हे ठरवण्याचा अधिकार आपला नाही, तो न्यायव्यवस्थेचा आहे. अशा पद्धतीची वक्तव्य करून आपण तपास यंत्रणा प्रभावित करत आहात. याकडे मुख्यमंत्री फडणविस यांनी संबंधीतांचे लक्ष वेधले. पुराव्याशिवाय आरोप करणे गैर आहे अशी आपली सतत भूमिका राहिली आहे. याचा देखील मुख्यमंत्र्यांनी या प्रकारणाच्या अनुषंगाने पुनरूच्चार केला आहे.



### शिंदे गुन्हेगार हे कुठेही म्हणाले नाही

सुषमा अंधारे म्हणाल्या, एकनाथ शिंदे हे गुन्हेगार आहेत असे माझे वक्तव्य कुठेही नाही. मात्र प्रकाश शिंदे याची चौकशी झाली पाहिजे यावर मी आजही ठाम आहे आणि प्रकाश शिंदे यांची चौकशी राजकीय शक्तींनी प्रभावित करू नये यासाठी त्यांचे सख्खे भाऊ म्हणून एकनाथ शिंदे यांनी ही चौकशी पूर्ण होईपर्यंत पदापासून दूर राहावे. त्यांचे भाऊ निर्दोष झाल्यानंतर त्यांनी पुन्हा उपमुख्यमंत्री काय अगदी 'मुख्यमंत्री' सुद्धा व्हावे. अभिनंदनचा पुष्पगुच्छ घेऊन मी स्वतः येईल. पण मुख्यमंत्र्यांनी जरा गांभीर्याने विचार करावा. जात धर्म आणि पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन मी महाराष्ट्रातल्या १४ कोटी जनतेच्या भविष्यासाठी लढत आहे कृपया आपण माझा लढा Demoralies करू नये, असे त्यांनी म्हटले आहे. सुषमा अंधारे या प्रकरणी आज पुन्हा एकदा पत्रकारांशी संवाद साधणार आहेत.

# महिलेच्या अंगावर कांदबरीच्या ओळी

वृत्तसंस्था १९ डिसेंबर

**वाशिंग्टन :** अमेरिकेतील हाऊस ओव्हरसाईट डेमोक्रॅट्सने गुरुवारी नवीन फोटोंची मालिका सार्वजनिक केली आहे. त्यात मायक्रोसॉफ्टचे बिल गेट्स यांच्यासह इतरही काही लोकांसोबत महिलांचे फोटो आहेत. तर एका फोटोमध्ये एका महिलेचा पाय दिसत असून त्यावर व्लादिमीर नाबोको याची वादग्रस्त कादंबरी लोलितामधील ओळी लिहिलेल्या आहेत. तर मुलींचे रेट लिहिल्याचे संदेशही या समितीच्या हाती लागला आहे. या फोटोमध्ये काही धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. बड्या लोकांसोबत मुली दिसत आहेत. त्यात अनेक दिग्गज आहेत. पण याचा अर्थ ते सगळेच जेफ्री एपस्टीनच्या लैंगिक शोषणाच्या रॅकेटमध्ये गुंतलेले होते.

# मनसेची विजयी निर्धार बैठक ! शिवसेना उबाठासोबत होणार युती



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महत्त्वाची बैठक गुरुवारी येथे झाली. ही बैठक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विदर्भ नेते राजू उंबरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडली.

या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी मनसेची रणनीती, संघटनात्मक बांधणी, प्रभागनिहाय तयारी तसेच इच्छुक उमेदवारांच्या भूमिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अकोला शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या लोकाभिमुख धोरणांचा विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस जिल्हाध्यक्ष राजेश काळे, पंकज साबळे, महिला सेनेच्या जिल्हाध्यक्ष प्रशंसा अंभरे, शहराध्यक्ष सौरभ भगत, शहराध्यक्ष राकेश शर्मा, जिल्हा सचिव ललित यावलकर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश फाले, मनविसे जिल्हाध्यक्ष रणजित राठोड यांच्यासह मनसेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवार उपस्थित होते.

# बेंबळा प्रकल्प निविदा घोटाळा प्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल

राहुल वासनिक १९ डिसेंबर

**यवतमाळ :** बेंबळा सिंचन प्रकल्पातील मुख्य कालव्याच्या माती काम आणि बांधकाम निविदांमध्ये मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. बनावट व खोटे दस्तऐवज तयार करून शासनाची दिशाभूल केल्याच्या आरोपाखाली अवधूतवाडी पोलिसांनी तीन ठेकेदारांवर भादंविच्या कलम ४६५, ४६६, ४७१ आणि ३४ अंतर्गत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. हा प्रकार तब्बल दहा-पंधरा वर्षांपूर्वीचा असून, नागपूर उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये झालेल्या चौकशीत निष्पन्न झाला आहे. पहिल्या प्रकरणात (अप.क्र. १६४४/२०२५) ठेकेदार सतीश दत्तात्रय भोयर (वय ६५, रा. सत्यनारायण लेआऊट, वडगाव रोड, यवतमाळ) आणि अभयकुमार एन. पनवेलकर (वय ७१, रा. नागपूर) यांनी एस.डी. भोयर अँड कंपनी व पी.के. कन्स्ट्रक्शन (नागपूर)च्या जॉइंट व्हेंचरसाठी बनावट सहीचे दस्तऐवज तयार करून निविदा प्रक्रियेत फसवणूक केल्याचे समोर आले आहे. हा प्रकार ३ ऑक्टोबर २००६ ते २५ जून २०१४ या कालावधीतील आहे.

दुसऱ्या प्रकरणात (अप.क्र. १६४५/२०२५) सुमित रमेश चंद बाजोरीया (वय ५०, रा. दर्डा नगर, दारव्हा रोड, यवतमाळ) याने मेसर्स बाजोरीया कन्स्ट्रक्शन कंपनी आणि इतर दोन कंपन्यांच्या नावाने स्वतःच्या सहीचे खोटे दस्तऐवज तयार करून शासनाला चुकारल्याचे उघड झाले. हा प्रकार २ फेब्रुवारी २००८ ते २१ जुलै २०१२ दरम्यानचा आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक अभय मुरलीधर आष्टेकर (वय ५०) यांच्या फिर्यादीवरून हे गुन्हे १८ डिसेंबर २०२५ रोजी दाखल करण्यात आले.

# भीषण अपघातात मायलेकी जागीच ठार




प्रतिनिधी १९ डिसेंबर

**खामगाव:** नांदुरा खामगाव मार्गावर आमसरी फाट्याजवळ १८ डिसेंबर रोजी भीषण अपघात घडला. समोरून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दुचाकीवर बसलेल्या शीतल दिलीप बोंबटकर व त्यांची चिमुकली मुलगी श्रावणी यांचा जागीच मृत्यू झाला. तर पती दिलीप प्रभाकर बोंबटकर हे थोडक्यात बचावले.

अपघात इतका भीषण होता की आई-लेकीने घटनास्थळीच प्राण सोडले. अपघातात मृत्युमुखी पडलेले कुटुंब हे निमगाव जवळील नारायणपूर येथील बोंबटकर कुटुंब असल्याची माहिती आहे. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. फरार ट्रक चालकाचा शोध सुरू आहे.

# वाळवंटी सौदीत जोरदार बर्फ वृष्टी !

वृत्तसंस्था १९ डिसेंबर

**नवी दिल्ली:** सौदी अरेबिया म्हटलं की डोळ्यांसमोर येतात ते अथांग पसरलेले वाळवंट आणि कडक ऊन. मात्र, १८ डिसेंबर २०२५ रोजी या वाळवंटी देशाने सर्वांनाच थक्क केले आहे. सौदीतील तबुक प्रदेश आणि ट्रोजेना पर्वतरांगांमध्ये भीषण बर्फवृष्टी झाली असून, संपूर्ण परिसर बर्फाने पांढरा शुभ्र झाला आहे. येथील तापमान शून्याच्याही खाली म्हणजे उणे ४ अंश सेल्सिअसवर (-4°C) पोहोचले आहे. उत्तर सौदीतील तबुक प्रांतातील जबल अल-लावज म्हणजेच 'बदामाचा पर्वत' हा परिसर या बर्फवृष्टीचे मुख्य केंद्र ठरला आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २,५८० मीटर उंचीवर असलेल्या या डोंगराळ भागात इतका बर्फ पडला आहे की, तिथल्या खडकाळ दऱ्या आणि वाळूचे डोंगर एखाद्या युरोपीय देशासारखे दिसू लागले आहेत.

# शिवसेनेला 'त्या' ८४ जागा देण्यास भाजपचा नकार !

## सत्ता महायुतीची असली तरी बहुमत भाजपचेच

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**मुंबई :** महायुती म्हणून मुंबईत भाजप आणि शिवसेना एकत्र लढणार असले तरी त्यांचे जागांवर गाडे अडले आहे. भाजपने शिवसेनेला ८४ जागा सोडण्यास नकार दिल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे जरी १५० जागांवर एकमत झाले म्हणत असले तरी शिवसेनेच्या हक्काच्या ८४ जागांचा प्रश्न कायम आहे.

२०१७ मध्ये ८४ जागांवर शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले होते. यातील बहुतांश माजी नगरसेवक आता एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहेत. त्यामुळे शिवसेनेला या जागांवर उमेदवारी न दिल्यास शिवसेना उमेदवारांमध्ये नाराजी पसरू शकते.

भाजप आणि शिवसेना यांच्या पहिल्या फेरीत दीडशे जागांवर सहमती झाली. यात ५२ जागा शिवसेनेला देण्यात आल्या. मुंबई महापालिकेत २२७ नगरसेवक आहेत आणि शिवसेनेची १२५ जागांची मागणी आहे.

### भाजपमधील घराणेशाहीला पदाधिका-यांचा विरोध

भाजप पदाधिकाऱ्यांनी मुंबई अध्यक्ष अमित साटम यांना पत्र लिहिले आहे. यात भाजपच्या कार्यकर्त्यांना संधी द्या, अशी मागणी केली आहे. नेत्यांच्या मुलांना उमेदवारी देताना कार्यकर्त्यांवर अन्याय होते. असे भाजपमध्ये होऊ नये, यासाठी पदाधिकार्यांनी पत्र लिहिले आहे. हा एकप्रकारे भाजपमधील घराणेशाहीला इशारा असल्याचे मानले जाते.

### भाजपच्या वर्चस्वासाठी २० जणांची समिती

काहीही झाले तरी मुंबईवर महायुतीची सत्ता असली पाहिजे आणि त्यातही भाजपचे वर्चस्व हवे, यासाठी भाजपने नव्या २० जणांची समिती स्थापन केली आहे. मुंबईत एकूण २२७ जागा असून ११४ चे बहुमत आहे. त्यामुळे भाजपला बहुमत मिळाले पाहिजे, या दृष्टीने ही समिती विजयासाठी जंग जंग पछाडणार आहे. या समितीत मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम, माजी अध्यक्ष आशिष शेलार, विनोद तावडे, प्रविण दरेकर, राहुल नार्वेकर, अतुल भातखळकर, मंगल प्रभात लोढा, पियुष गोयल आदींचा समावेश आहे.

# शिवणी महसूल मंडळात फार्मर आयडीचा गोंधळ

## शासकीय योजनांपासून शेतकरी वंचित

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला:** अकोला तहसील अंतर्गत शिवणी महसूल मंडळातील डोंगरगाव, सिसा, मासा, उदेगाव, बाभूळगाव जहाँ, कुंभारी, बोदरखेड, हिंगणा, कुंभारी, येवता आदी गावांतील अनेक शेतकयांचे फार्मर आयडी अद्याप ॲक्टिव्ह नसल्याने शेतकरी विविध शासकीय योजनांपासून वंचित राहत आहेत. पीक विमा, अनुदान, मदत योजना, कर्जसुविधा आदीसाठी फार्मर आयडी अनिवार्य असताना ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.या प्रश्नाबाबत संबंधित गावांतील अनेक शेतकरी अकोला तहसील कार्यालयात वारंवार फे-या मारत आहेत. मात्र, कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून ठोस मार्गदर्शन न करता उड़वा उडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे शेतकरी अधिकच संभ्रमात सापडले असून, वेळ व पैशाचा अपव्यय होत आहे.

आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि वाढत्या खर्चामुळे शेतकरी अडचणीत असताना, प्रशासकीय अडथळ्यांमुळे शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यामध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. फार्मर आयडी अ?क्टिव्ह नसल्यामुळे शेतकरी शासनाच्या योजनांपासून वंचित राहत आहेत. तहसील कार्यालयात गेल्यावर शेतकऱ्यांना समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून ही अडचण दूर करावी अशी मागणी डोंगरगावचे उपसरपंच किशोर काकडे आदींनी केली आहे.


# साहेब, माझ्या मुलाला मरण द्या !

## पालकाची सर्वोच्च न्यायालयात धाव ▶▶ 12 वर्षांपासून मुलगा कोमात

वृत्तसंस्था १९ डिसेंबर

**नवी दिल्ली :** 'माझा मुलगा गेली बारा वर्षे कोमात आहे. त्याचं आयुष्य उरलेलं नाही, केवळ श्वास सुरू आहे. त्याला आता वेदनांतून मुक्त करा,' अशी हृदयद्रावक विनंती करणाऱ्या पालकांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रत्यक्ष भेट घेणार आहेत.

या भेटीसाठी १३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजताची वेळ निश्चित करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने प्रकरणातील मानवी वेदना अधोरेखित केल्या. 'समोर आलेला वैद्यकीय अहवाल अत्यंत दुःखद आहे. या स्थितीत या



तरुणाला अशाच अवस्थेत पुढे ठेवणे योग्य ठरणार नाही,' असे मत न्यायालयाने व्यक्त केले. हा खटला केवळ कायद्यापुरता मर्यादित नसून तो मानवी करुणा, नैतिकता आणि संवेदनशीलतेची कसोटी असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे केवळ कागदपत्रांच्या आधारे निर्णय न घेता, पालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांची मानसिक अवस्था समजून घेणे आवश्यक असल्याचे न्यायमूर्तींनी नमूद केले.

या याचिकेतील तरुण हरीश राणा याला २०१३ मध्ये एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडल्याने मेंदूला गंभीर इजा झाली. त्या अपघातानंतर तो कोमात गेला आणि आजतागायत तो शुद्धीवर आलेला नाही. सध्या त्याचे आयुष्य पूर्णतः कृत्रिम जीवनसाहाय्यावर अवलंबून आहे. श्वसनासाठी ट्रॅकिओस्टॉमी ट्यूब, तर अन्नासाठी गॅस्ट्रोस्टॉमी ट्यूबचा वापर केला जात आहे. गेल्या बारा वर्षांच्या काळात त्याच्या प्रकृतीत कोणतीही सकारात्मक सुधारणा झालेली नाही.

डॉक्टरांनी सादर केलेल्या अहवालांनुसार, रुग्ण पूर्णपणे शुद्ध हरपलेल्या अवस्थेत आहे. त्याच्या शरीरावर गंभीर बेडसोअर्स झाले असून, उपचारांनंतर बरे होण्याची शक्यता जवळपास शून्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मेंदूच्या कार्यात सुधारणा होण्याची कोणतीही चिन्हे दिसून आलेली नाहीत.

### न्यायमूर्ती पालकांची व्यथा घेणार समजून!

सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्ये निष्क्रिय इच्छा मरणासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार, अशा निर्णयात केवळ वैद्यकीय निष्कर्ष महत्त्वाचे नसून, रुग्णाच्या कुटुंबीयांची भूमिका, त्यांची मानसिक स्थिती आणि दीर्घकाळ चाललेली वेदना यांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती पालकांना प्रत्यक्ष भेटून त्यांची व्यथा समजून घेणार असून, त्यानंतरच या संवेदनशील प्रकरणावर पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

# बी.आर. हायस्कूलसमोर खड्ड्यांनी नागरिक त्रस्त

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिका शहरात स्वच्छता मोहिमा राबवत असल्याचा गाजावाजा करत असली, तरी दुसरीकडे मूलभूत सुविधांकडे केलेल दुर्लक्ष नागरिकांना महागात पडत आहे. बी.आर. हायस्कूलसमोरील मुख्य रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून स्थानिक नागरिकांचा संताप वाढला आहे.

या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहन चालक धोकादायक स्थितीतून मार्गक्रमण करत आहे. पाईपलाईन टाकण्याच्या कामानंतर रस्ता खोदून तसाच सोडण्यात आला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप रस्ता दुरुस्त करण्याची कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे.

# भाजप महायुती म्हणून निवडणुक लढविणार

## आमदार रणधीर सावरकर यांचा दावा



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला:** भाजप महायुती म्हणूनच निवडणूक लढविणार असून त्यादृष्टीने आमचा प्रयत्न सुरु झाले आहे. आम्ही ५५-६० पेक्षा अधिक जागांवर भाजपचे उमेदवार उभे करणार आहोत. गेल्या निवडणुकीत ४८ जागांवर आम्ही विजयी झालो होतो. त्याच बरोबर दूसऱ्या क्रमांकावर देखील आम्ही गेल्यावेळी अतिशय कमी मतांनी पराभूत झालो. त्या जागा देखील मुळात आमच्या आहेत. इतकेच नाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे असतील, उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार असतील यांच्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांशी आमचा संवाद आहे मैत्री आहे. त्यामुळे महायुती म्हणूनच आम्ही समोर जाणार आहोत. त्यामुळे भाजप व महायुतीची सत्ता स्थापन करण्यासाठीचा आमचा यशस्वी निकालात दिसेल. असा विश्वास आज आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला. ते भाजप निवडक माध्यमांसोबत बोलत होते. यावेळी भाजप नेते विजय अग्रवाल, जयंत मसने, गिरीश जोशी आदींची उपस्थिती होती.

अकोल्यातील जनतेच्या अपेक्षा आम्हाला माहित आहे. जनतेच्या संवादातून आम्हाला अनेक सजेशन मिळाले आहे. स्थानिक नागरिकांशी आमचा संवाद आहे. गेल्या दहा बारा वर्षात नागरी सुविधांचे पॅरामिटर बदलले आहे. जाहिरनाम्यात आम्ही सामील केलेल्या भुमिका आम्ही प्रत्यक्षात अमलात आणू. बुथनिहाय बैठक झाल्या आहेत. मतदार संघात साडेपाच लाख मतदार आहे. पाचशे बुथ आहे. बुथ निहाय आम्ही काम करत आहोत. बुथ लेव्हल च्या मिटिंग मध्ये भाषण देणे आम्ही बंद केले आहे. बुथ लेव्हल ला शहर विकासाच्या उणिवा आम्ही जाणून घेत आहोत त्या उणिवा आम्ही दूर करत आहोत. असे या वेळी पत्रकारांशी बोलताना आमदार रणधीर सावरकर यांनी स्पष्ट केले.

CMYK

# ध्वजनिधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळावा

प्रतिनिधी १९ डिसेंबर


अमरावती, : सर्व माजी सैनिकांना, वीर पत्नींना कळविण्यात येते की, मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्वजनिधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळावा संपन्न होत आहे. तरी सर्व माजी सैनिक, वीर पत्नी यांनी सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत







प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अमरावती**: संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून दोन विद्यार्थ्यांनी संपूर्ण विद्यापीठ यादीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय हे गुणवत्तेची खाण म्हणून ओळखले जाणारे विद्यापीठ क्षेत्रातील एकमेव विधी महाविद्यालय आहे. यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपला दबदबा कायम ठेवला आहे. एल.एल.एम या दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी परीक्षेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाची कुमारी विशाखा शेखर बिडवाई हिने संपूर्ण गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावले आहे.तर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत याच महाविद्यालयाची एलएलबी पाच वर्षीय अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी कुमारी साक्षी भरत कुपारेल हिने देखील प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या कृणाली वासुदेव चालक हिने पाचवा क्रमांक, ऋषिकेश श्याम काळकर याने गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक तसेच आदित्य राघवेंद्र उपाध्याय याने विद्यापीठाचा गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक प्राप्त केला आहे.एल.एल.बी तीन वर्षीय अभ्यासक्रमांमधून वैजयंतीराजे विश्वास काळे हिने गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक, शिल्पा राजू गुल्हाने हिने सातवा क्रमांक आणि योगेश रामकृष्ण सोळंके यांनी दहावा क्रमांक प्राप्त करत विद्यापीठ गुणवत्ता यादीत आपले स्थान प्राप्त केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ वर्षा देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अमरावती** : अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना याबाबत माहिती मिळावी यासाठी दरवर्षी १८ डिसेंबर रोजी 'अल्पसंख्याक दिवस' साजरा करण्यात येतो. अल्पसंख्यांक हक्क दिवसाचे औचित्य साधून आज नियोजन भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगर प्रशासन सहाय्यक आयुक्त विकास खंडारे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, कौशल्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, योजना शिक्षणाधिकारी राजेश वरखडे, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी इम्रान खान, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी नरेंद्र गायकवाड, पोलीस उपअधीक्षक राजेश भोयर यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगामार्फत अल्पसंख्यांकांसाठी शासनाने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना व्हावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सहाय्यक आयुक्त श्री. खंडारे यांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत विविध योजना उपक्रम राबविले जातात. त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा , असे आवाहन केले. अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्काची जाणीव व्हावी यासाठी हा दिवस साजरा करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती भाकरे यांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या योजना, विविध उपक्रम, शिष्यवृत्ती याबाबत माहिती दिली. सहाय्यक आयुक्त श्रीमती बारस्कर यांनी कौशल्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्लेसमेंट ड्राईव्ह याबाबत माहिती दिली. यावेळी शिक्षकवृंद, विद्यार्थी, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सुरेंद्र रामेकर यांनी मानले.

# राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी १९ डिसेंबर

♦ आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध करून देणार -जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती** : जिल्ह्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करतात. नैसर्गिक क्रीडा कौशल्य असूनही अत्याधुनिक साहित्याअभावी खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कमी पडतात. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील नाविण्यपूर्ण योजनेतून किमान १० ते १५ आंतरराष्ट्रीय खेळाडूंना ५० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर दिली. राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर दि. १७ ते २० डिसेंबर २०२५ या दरम्यान होत आहे. आज या स्पर्धेचे उद्घाटन पार पडले. यावेळी राज्य धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ?ड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रमोद चांदूरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, आदी उपस्थित होते. श्री. येरेकर यांनी, प्रतिभा असलेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय आणि ऑलिंपिक स्पर्धेकरीता आवश्यक असलेले साहित्य उपलबध झाल्यास जिल्ह्यातील खेळाडू यात सहभागी होण्यास मदत होईल. खेळाडूंनी सकारात्मक विचार करुन जीवनामध्ये यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन केले. तसेच स्पर्धेचे रितसर उद्घाटन केले. राज्यस्तरीय १७ व १९ वर्ष मुले आणि मुली शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेत सन २०२५-२६ मध्ये राज्यातील ८ ही विभाग आणि एका क्रीडा प्रबोधिनीतील ४८५ मुले व मुली खेळाडू, पंच, सामनाधिकारी, निवड समिती सदस्य व संघ व्यवस्थापक स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या राज्यस्तरीय शालेय आर्चरी स्पर्धेचे मुले व मुली या वयोगटातील सर्व सामने जिल्हा क्रीडा संकुलातील खेलो इंडिया आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर सुरु झाले आहे. दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी धनुर्विद्या प्रकारामधील इंडियन राऊंडची स्पर्धा झाली. दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी कंपाऊंड राऊंड, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रिकर्व्ह राऊंडचे सामने होणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमात सुरवातीला जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहन व क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदिप शेटीये यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी आभार मानले.

# अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची प्रारुप यादी प्रसिद्ध

प्रतिनिधी १९ डिसेंबर

♦ लिंकवर मतदारांना शोधता येणार आपले नाव

**अमरावती**: भारत निवडणूक आयोगाने अमरावती विभाग शिक्षक विधानपरिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. यानुसार, दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षक मतदार संघाची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, मतदारांना आता घरबसल्या आपले नाव ऑनलाइन शोधता येणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालय आणि विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये ही यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. दि १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ऑनलाइन नाव शोधण्यासाठी अधिकृत लिंक शिक्षक मतदारांच्या सुविधेसाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे. अमरावती विभागातील सर्व पात्र शिक्षकांनी या प्रारुप यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करावी. याबाबत अधिक माहिती हवी असल्यास संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन उप-जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# तालुका विज्ञान प्रदर्शनीत वंश ठाकरे आणि अथर्व यादव यांचे 'मनोरंजक गणितीय मॉडेल' ठरले आकर्षण

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**दर्यापूर**: दर्यापूर शैक्षणिक विचार मंच, विज्ञान अध्यापक मंडळ, मुख्याध्यापक संघ तसेच पंचायत समिती दर्यापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुकुल माध्यमिक विद्यालय, शिवर रोड, दर्यापूर येथे ११ व १२ डिसेंबर २०२५ रोजी ५३ वी तालुका विज्ञान प्रदर्शनी उत्साहात पार पडली.

शैक्षणिक सत्र २०२५–२६ अंतर्गत आयोजित या विज्ञान प्रदर्शनात विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरण, गणित, आरोग्य आणि नवोपक्रम यांवर आधारित मॉडेल्स सादर केली. यामध्ये वंश किशोर ठाकरे आणि अथर्व बाळू यादव याने 'मनोरंजक गणितीय मॉडेल' हे आकर्षक व उपयुक्त मॉडेल सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.या मॉडेलद्वारे वंशआणि अथर्व यांनी गणितातील गुंतागुंतीच्या संकल्पना सोप्या, खेळकर आणि समजण्यास सुलभ पद्धतीने मांडल्या. संख्यात्मक क्रिया, पॅटर्न, तर्कशक्ती आणि गणितीय प्रक्रियांना मनोरंजक स्वरूप देऊन विद्यार्थ्यांना गणिताची आवड निर्माण करण्याचा अभिनव प्रयत्न त्यांच्या मॉडेलमध्ये दिसून आला. विद्यार्थ्यांच्या समस्या सोपीकरण क्षमतेत वाढ करणाऱ्या या मॉडेलचे परीक्षकांनी



विशेष कौतुक केले. स्पर्धात्मक वातावरणात उत्कृष्ट सादरीकरण व अभिनव कल्पनांच्या जोरावर वंश किशोर ठाकरे व अथर्व बाळू यादव याने पहिला क्रमांक पटकावून तालुक्यातील विज्ञान क्षेत्रात मानाचा ठसा उमटविला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री मनोजराव देशमुख, शिक्षक प्रतिनिधी श्री. अनिलभाऊ भारसाकळे , कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी श्री.पि.डी.गावंडे , हायस्कूल प्रभारी मा.पी.एम.काळे,सकाळ पाळीचे प्रभारी मा. श्री.डी.बी.ठाकरे , शिकेत्तर प्रतिनिधी मा. प्रदीपभाऊ भारसाकळे यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्रभारी मार्गदर्शक शिक्षिका डॉ. विजया बोंद्रे , मा. श्री.एस. बी. ठाकरे ,मा. श्री. अंजलीताई रेचे यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अमरावती मेस्को क्षेत्रीय कार्यालयात माजी सैनिकांसाठी लिपिक पदांची भरती

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अमरावती**: मेस्को क्षेत्रीय कार्यालय, सैनिकी मुलांचे वसतिगृह नवसारी, अमरावती येथे भारतीय संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांसाठी 'लिपिक नि टंकलेखक' या पदाच्या एकूण दोन जागांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. या पदासाठी सशस्त्र सेना दलातील निवृत्त जेसीओ, ओआर, वीर पत्नी अर्ज करू शकतात. उमेदवाराचे वय ५७ वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. शैक्षणिक पात्रतेमध्ये मराठी भाषेचे ज्ञान, एम.एस. ऑफिस, अकाऊंटिंग आणि मराठी व इंग्रजी टायपिंगचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.लष्करी सेवेत कार्यालयीन अधीक्षक किंवा मुख्य लिपिक पदाचा अनुभव असलेल्यांना निवडीत प्राधान्य दिले जाईल. तसेच उमेदवाराची वैद्यकीय श्रेणी शक्यतो 'शार्प-१' असावी. निवड झालेल्या उमेदवारास दरमहा तीस हजार रुपये मानधन दिले जाईल. इच्छुकांनी आपले अर्ज ५ जानेवारी २०२६ पर्यंत या ई-मेलवर किंवा 'क्षेत्रीय कार्यालय अमरावती, सैनिकी मुलांचे वसतिगृह, नवसारी, अमरावती-४४४६०४' या पत्त्यावर पोस्टाने पाठवावेत.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणी आरोपीची जामीनावर सुटका

प्रतिनिधी १९ डिसेंबर

♦ एड सपना जाधव यांची सफल पैरवी

**अमरावती** :पुलिस स्टेशन नंदगांव पेठ यथे १/११/२०२५ रोज़ी पीड़ितने तक्रार दाखल केली की, पिडीतेचे मोबाइल वरून पीडित आरोपी सोबत बोलत होती नंतर आरोपी याने पिडीता हि अल्पवयीन आहे हे माहित असून सुध्दा तिला रहाटगाव नांदगाव पेठ जि. अमरावती येथील हॉटेल न्यु रिच गार्डन रेस्टॉस्ट ॲन्ड लॉजींग येथे घेवून जावून तेथील रूमवर लग्नाचे आभीश दाखवून तिचे सोबत शरीर संबंध केले,

दि ३०/१०/२०२५ रोजी तिचे पोट दुखत असल्याने पिड़ित चे वडील यांनी तिला प्राथमिक आरोग्य केंद्र तळवेल येथे उपचाराकरीता घेवून गेले तेथे डॉक्टरांनी तपासणी केली तेव्हा समजले की आरोपी सोबत अंदाजे में- जून २०२५ मध्ये रहाटगाव अम्रावती येथील हॉटेल न्यु रिच गार्डन रेस्टॉरंट ॲन्ड लॉर्जीग मध्ये रूमवरील झालेल्या शरीरसंबंधाने ती गर्भवती आहे त्यामुळेपुढील उपचार करण्यासाठी डफरीन अमरावती येथे भरती केले व म्हनून आरोपी याने पीड़ित हिला लग्न करण्याचे आमीश दाखवून तिच्या सोबत वारंवार शारीरीक संबंध केले .

त्यामुळे ती गर्भवती झाली तरी त्याचेवर योग्य ती कार्यवाही ३ म्हणून अरोपी विरुद्ध कलम ६४(२)(म) भारतीय न्याय संहिता व कलम ४ अनि ६ पॉक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला व आरोपीची अटक करुण प्रकरणाचा तापस सुरु केला त्या दरम्यान आरोपीणे ऐड सपना जाधव ह्यांच्या मार्फ़त विद्यमान विशेष जिल्हा न्यायालय अमरावती येथे जमानत चे अर्ज सादर करुण प्रकरणात आरोपी निर्दोष असुन दोघा मध्ये प्रेम संबध आहे अश्या प्रकरणात विद्यमान उच्च न्यायालय नागपुर खंडपीठ यानी वेळोवेळी आरोपीची जमानत वर सोडले आहे का , अशी मांडणी केली, प्रकरणातील दोन्ही बाजूँचे म्हणने ऐकून व प्रकरणातील सर्व दस्तैवज ची पड़तालनी करुण विद्यमान विशेष जिल्हा न्यायालय अमरावती यानी दी १८/१२/२०२५ रोज़ी आरोपिस जमानत मंजूर केली सदर प्रकरणात ऐड सपना जाधव यांचे सहकार्य ऐड मनोज कल्ला व ऐड आयुष तिवारी हयानी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# विवाहितेचा छळ; नऊ जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**खामगाव** : माहेर वरून पैसे आणले नाहीत, या कारणावरून विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करून तिला मारहाण केल्याच्या आरोपाखाली शिवाजीनगर पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सतीफैल भागातील रामेश्वरी योगेश बारवासे (२४) यांच्या तक्रारीनुसार, पती योगेश नारायण बारवासे, नारायण ऊर्फ जुम्मन लादू बारवासे, शारदा नारायण बारवासे, भारती विलास खरारे, विलास शीतल खरारे, कल्पना कैलास खरारे, कैलास शिवलाल खरारे, सुष्मिता ऊर्फ सोनू संजय उंटवाल व संजय रतन उंटवाल यांनी संगनमत करून माहेरून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केली, असा आरोप तक्रारीत केला आहे.

# युगधर्मा पब्लिक स्कूलतर्फे अजिंठा–वेरूळ शैक्षणिक सहल

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**खामगाव** : युगधर्मा पब्लिक स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अजिंठा–वेरूळ या ऐतिहासिक स्थळांची शैक्षणिक सहल मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली होती. या सहलीसाठी शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांनी सहमती दिली होती. सहल प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडली.




सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी प्रथम बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध जाळीच्या देवाचे भक्तिभावाने दर्शन घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा प्रवास अजिंठा–वेरूळकडे सुरू झाला. बसमधील प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांनी गाणी, खेळ, कोडी, प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमांचा आनंद घेतला. मुलांनी एकमेकांशी गप्पा मारत, हसत-खेळत प्रवासाचा मनसोक्त आनंद लुटला. सहलीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी अजिंठा व वेरूळ येथील गुंफांचे बारकाईने निरीक्षण केले. प्राचीन शिल्पकला, भित्तीचित्रे आणि भारतीय इतिहासाबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी एकत्र बसून जेवणाचा आनंद घेतला. सर्वांनी आपापसात जेवण वाटून घेत सहलीचा आनंद द्विगुणित केला. जेवणानंतर विविध खेळ खेळण्यात आले, छायाचित्रे काढण्यात आली आणि आठवणी जपल्या गेल्या. मुलांनी या सहलीतील प्रत्येक क्षण मनापासून अनुभवला. या सहलीत इयत्ता दुसरी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसोबत शिक्षक पायल मॅडम, अश्विनी मॅडम, शिवाजी,विशाल हे शिक्षक तसेच सुरेखाताई उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने एकाचा मृत्यू

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**खामगाव** : चितोडा शिवारातील एका शेतात चिखलात अडकलेल्या म्हशीला बाहेर काढण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास घडली. शे. युनुस शे. जान (४२) असे मृतकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील चिखलात म्हैस अडकली होती. तिला वाचवण्यासाठी शे. युनुस शे. जान तेथे गेले असता, त्या ठिकाणी असलेल्या विद्युत प्रवाहाच्या संपर्कात आल्याने त्यांना तीव्र विजेचा धक्का बसला. यात ते गंभीर जखमी झाले. तत्काळ मदत मिळण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेत म्हैस देखील दगावली असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. ही घटना निदर्शनास येताच, प्रत्यक्षदर्शी नातेवाइकांच्या आणि मदतीने मृतदेह बाहेर काढून खामगाव येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आला.

# शहरात रस्त्यांची दुरवस्था कायम



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**खामगाव** : शहरात काही रस्ते खूप खराब झाले आहेत. मुख्य रस्त्यांची स्थिती गंभीर होत असून स्थानिक नागरिकांचा संताप वाढला आहे.

या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहन चालक धोकादायक स्थितीतून मार्गक्रमण करत आहे. पाईपलाईन टाकण्याच्या कामानंतर रस्ता खोदून तसाच सोडण्यात आला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप रस्ता दुरुस्त करण्याची कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे.

रस्ता उखडल्यामुळे येथे कधीही अपघात होण्याची शक्यता आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचाही प्रवास धोकादायक झाला आहे. नगरपालिकेकडून फक्त बोर्ड लावून जबाबदारी झटकण्याचे प्रकार सुरू असून प्रत्यक्ष काम मात्र ठप्प असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. नागरिकांनी तात्काळ रस्ता दुरुस्त करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त केली आहे.

सिटी न्यूज अकोला


शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# शासकीय कामात अडथळा प्रकरणी गुन्हा दाखल

**तेल्हारा :** परिवहन मंडळाच्या बस क्रमांक एम एच १४ बीटी २८९६ चे चालक विशाल गजानन इंगळे हे शेगाव ते आकोट जाण्याकरिता प्रवासी घेऊन १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.४५ वाजता निघाले असता आडसूळ फाटा येथे ८.३० वाजता पोहोचले असता आरोपी दिव्यांग इसम गजानन सीताराम अस्वार याने बस चालक विशाल इंगळे याच्यावर बळाचा वापर करून त्याला जीवाने मारण्याची धमकी दिली इतकेच नव्हे तर थापडा-बुक्क्यांनी मारहाण केली, शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा आशयाच्या तक्रारीवरून तेल्हारा पोलिस स्टेशनमध्ये आरोपी विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तेल्हारा पोलिसांनी यातील आरोपी विरुद्ध १८ डिसेंबर रोजी फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हे दाखल केले असून पुढील तपास हवालदार शामसुंदर पेंद्रे करीत आहेत.

## डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी हायस्कूल येथे रंगभरण स्पर्धा

प्रतिनिधी १९ डिसेंबर



**तेल्हारा:** येथील श्री शिवाजी हायस्कूल येथे शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त तालुका शालेय रंगभरण स्पर्धा आयोजन करण्यात आली आहे या स्पर्धेत अ गट मध्ये वर्ग १ते५वा तर ब गटात वर्ग ६ते८वा मध्ये तालुका विद्यार्थी सहभागी सहभागी होणार आहेत. सुरेशदादा खोटरे कार्यकारिणी सदस्य, सर्व आजिव सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, उद्धवराव विखे शाळा तपासणी अधिकारी, व्हि डि गावंडे मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

संबंधित स्पर्धा मध्ये सहभागी होणारे स्पर्धाकांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे अशी माहिती धनंजय भंगाळे जयंती उत्सव प्रमुख सौ शर्वरी हिंगणकर जयंती उत्सव प्रमुख रंग भरणा स्पर्धा प्रमुख शांतीकुमार सावरकर, बळीराम कुवारे यांनी दिली आहे. रंगभरण स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

# लंपी रोगामुळे गोऱ्हयाचा मृत्यू, पाय तोंडखुरीचा कहर

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोट** : वाढत्या थंडीच्या दिवसांमध्ये जनावरांवर रोगराईचा प्रादुर्भाव वाढता आहे. वडाळी देशमुख मधील शेतमजूर सचिन वैतकार व कैलास खडीशंकर यांच्या गोठ्यातील गाय म्हैसी १० ते १२ जनावरावर पाय तोंड खुरीची मोठ्या प्रमाणात लागण लागली असून त्याचा वाढता प्रादुर्भाव आहे. काही जनावरांना वेगळ्या ठिकाणी ठेवले जेणेकरून रोग वाढू नये. पणज येथील कंपाउंडर यांना विचारणा केली असता ते म्हणतात आम्ही वडाळीत कॅम्प घेतला तपासणी करून औषध उपचार केला. संतप्त शेतकऱ्यांनी अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात असे सांगितले. सरपंचांनी गावंडेशी फोनवरून स्पष्ट करून दिले. अकोलखेड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियान पंधरवडा मध्ये गावामध्ये पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हता. गावात लंपीच्या साथीला ८ ते १० जनावरे बळी पडले. त्यामध्ये दादाराव रायबोले यांचा पटाचा ८० हजार चा गोरा मृत्यू झाला प्रशासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी परिवाराकडून मागणी होत आहे व गोपाल रंधे यांच्या बैलाला पाय व तोंड खुरीचा प्रादुर्भाव वाढतच आहे त्यावेळेस पासून गावामध्ये एकही अधिकारी फिरकला नाही असा शेतकऱ्यांचा आरोप होत आहे याला येथील संबंधित पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गलथान कारभार बेजबाबदार आहे त्यामुळे पशु मालकाकडून या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे व परिसरात वाढत्या रोग राहिला आळा घालण्यासाठी औषध उपचार लस व कॅम्प लावण्याची मागणी होत आहे, यावेळी पणज येथील पशुवैद्यकीय दवाखाना ही शोभेची वस्तू बनली आहे असा पशु मालक शेतकऱ्यांचा रोज व्यक्त होत आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत गावंडे यांनी दोन दिवसांत संपर्क साधण्याचे आश्वासन दिले.



### जनावरांवर रोगराईचा प्रादुर्भाव

◆ माझ्या १० ते १२ जनावरांना पाय व तोंडखोरीचा प्रादुर्भाव वाढला आहे. गावात कॅम्प औषध उपचारासाठी साधी दवंडी सुद्धा देण्यात आली नाही.

**सचिन वैतकार**, पशु मालक, वडाळी देशमुख

### बकऱ्या रोगाने ग्रस्त

◆ माझ्या बकऱ्या पाय व तोंडखोरी रोगामुळे आजारी पडले आहेत. एक मोठी बकरी शेम्बडी रोगामुळे मृत्युमुखी पडली.

**कैलास खडीशंकर**, वडाळी देशमुख

### पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

◆ माझ्या घरी गाय व गोऱ्याला पाय व तोंडखोरीचा मोठा रोग झाला आहे व आतापर्यंत पशु वैद्यकीय विभागाने औषध उपचार कोणताच केला नाही.

**गोपाल रंधे**, अकोलखेड शेतमजूर

### नुकसान भरपाई द्यावी

◆ माझा पटाचा महागडा गोऱ्हा हा लंपी रोगामुळे दगावला. तरी प्रशासनाने मला नुकसान भरपाई द्यावी.

**दादाराव ओंकारे**, अकोलखेड

# विदर्भस्तरीय कार्यकर्ता पुरस्काराने प्रा. प्रवीण गुल्हाने सन्मानित



प्रतिनिधी १९ डिसेंबर


**अकोला:** डॅडी देशमुख सामाजिक, सांस्कृतिक चळवळीतील कार्यकर्त्यांचे आधारवड होते असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने यांनी केले. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे विवेकनामा फाऊंडेशनच्या पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते.

श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, विवेकनामा फाऊंडेशनचे अध्यक्ष अविनाश पाटील,उद्योजक प्रशांत देशमुख, प्राचार्य अंबादास कुलट,विवेकनामाचे संयोजक बबनराव कानकिरड यांची प्रमुख उपस्थिती होती. विवेकनामा फाऊंडेशनच्यावतीने दिवंगत प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या नावाचा विदर्भस्तरीय कार्यकर्ता पुरस्कार अ. भा. मराठी विज्ञान परिषदेचे प्रा. प्रवीण गुल्हाणे यांना मान्यवरांच्या हस्ते २१००० रू, शाल व मानपत्र देवून सपत्नीक सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, समाजसंत गाडगेबाबा, डॅडी देशमुख यांच्या फोटोस पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. विचारपीठावरील मान्यवरांचे स्वागत विवेकनामा फाऊंडेशनचे संचालक नरेंद्र राणे मुंबई, प्रदीप हिवाळे बुलढाणा, डॉ. महेंद्र मेटे, प्रा. प्रशांत हरमकर, मायाताई वाकोडे यांनी केले.

याप्रसंगी पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष मधुभाऊ घारड, सदस्य प्रा. डॉ. कुमार बोबडे, डॉ. सुधीर बाजड,हर्षा ढोक, गायत्री आडे, प्रा. डॉ. राजेश मिरगे यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे प्रथम मानकरी सर्पमित्र बाळ काळणे अकोला यांचाही गौरव करण्यात आला. डॅडी देशमुख हे डॉ. पंजाबराव देशमुख याच्या विचारांचे सच्चे पाईक होते. त्यांनी जीव ओतुन संस्थेत काम केले. अनेक दिग्गज कलावंत,अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते संस्थेत आणले. विवेकनामा फाऊंडेशनने डॅडींच्या नावाने सुरु केलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे प्रतिपादन हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

प्रा. प्रवीण गुल्हाने यांनी यापुढे 'सायन्स ऑन व्हील ' उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबनराव कानकिरड यांनी केले. मानपत्र वाचन विशाल विमल पुणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा दापूरकर यांनी केले. आम्ही भारतीय जनसंस्कृतिक चळवळी चे राज्य समन्वयक डॉ. प्रकाश मानेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

## महानगरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा दोन दिवसीय जागर



**अकोला:** गत सतरा वर्षापासून महानगरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा जागर करीत वैचारिक प्रबोधन करणाऱ्या अ. भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये अनेक वैचारिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.दि २७ व २८ डिसेंबर रोजी सिव्हिल लाईन परिसरातील जि.प. कर्मचारी भवन येथे आयोजित या उत्सवाचा प्रारंभ शनिवार दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता गायत्री परिवाराचे डॉ. अजय उपाध्याय यांच्या सामूहिक ध्यान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने होणार आहे.

## अकोट पालिका निवडणूक : १२ टेबलवर मतमोजणी, २१ डिसेंबरला निकाल

वि. प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोट:** २ डिसेंबर रोजी पार पडलेल्या अकोट नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी सोमवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजतापासून सुरू होणार आहे. शहरातील पोपटखेड मार्गावरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे ही मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असून, यासाठी एकूण १२ टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणी एकूण ९ फेऱ्यांत होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. अकोट नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार तर नगरसेवक पदासाठी १६ प्रभागांतील १७४ उमेदवारांचे भवितव्य मतपेट्यांमध्ये सीलबंद झाले आहे. शहरातील एकूण १७ प्रभागांपैकी प्रभाग क्रमांक ४ मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उमेदवाराचा अपघाती मृत्यू झाल्याने त्या प्रभागातील नगरसेवक पदाची निवडणूक रद्द करण्यात आली होती. त्यामुळे उर्वरित १६ प्रभागांमध्येच नगरसेवक पदासाठी मतदान झाले. मात्र, नगराध्यक्ष पदासाठी प्रभाग क्रमांक ४ मध्ये मतदान प्रक्रिया पार पडली होती. या निवडणुकीसाठी शहरात एकूण ८२ हजार ३२५ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी २८ हजार ३९२ पुरुष व २५ हजार २२० महिला अशा एकूण ५३ हजार ६१२ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. नगराध्यक्ष पदाच्या ८ उमेदवारांपैकी तसेच नगरसेवक पदाच्या १७४ उमेदवारांपैकी कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडणार, याचा फैसला २१ डिसेंबर रोजी मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे. मतमोजणीदरम्यान कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, संपूर्ण शहराचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.

# श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथी सोहळा



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोट:** श्री संत कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने सावरा मंचनपुर येथील संत गाडगेबाबा सेवा समितीच्या पुढाकाराने अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथेचे आयोजन १३ पासून केले आहे. सांगता २० रोजी होईल.

आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या उपस्थितीत आरंभ झाला तर श्रीमद भागवत कथा भागवताचार्य हभप गजानन महाराज गहले करीत आहेत. दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ६ ते ७ ग्रामगीता वाचन व सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन शनिवार दि.१३ हभप रमेश महाराज आवारे खापरवाडी, रविवार दि.१४ हभप पुरुषोत्तम महाराज मुऱ्हेकार वडाळी देशमुख, सोमवार दि.१५ हभप गौरीताई मालठाणकर सिरसोली, मंगळवार १६ हभप दिनेश महाराज मंगळे जीतापूर, बुधवार १७ हभप श्रीनिवास महाराज अडगोकर रासेगाव, गुरुवार १८ हभप पांडुरंग महाराज लाजूरकर आळंदी देवाची, शुक्रवार १९ हभप रघुपती महाराज रोडे अकोट, तर शनिवार २० ला हभप गजानन महाराज गहले यांचे काल्याचे किर्तन व लगेच नंतर महाप्रसाद होईल, या सप्ताहामध्ये मृदंगाचार्य हभप पुरुषोत्तम म. घोडिले, गायनाचार्य हभप श्रीकृष्ण म. पिंपळे, हभप प्रफुल्ल म.रोंगे, गणेश म.चांदुरकर, हभप पुरुषोत्तम म. मुऱ्हेकार , तबलावादक हभप अमोल म. गवई , हार्मोनियम हभप रमेश म. सपकाळ,रामधुन हभप मोहन म. नारे, हरिपाठ ह भ प पुरुषोत्तम म. मुऱ्हेकार, संत सावता माळी भजनी मंडळ वडाळी देशमुख, किर्तन सात करणारी मंडळी विठ्ठल राऊत, अतुल हुसे, संदीप धनोकार, देवेंद्र हुसे, मंगेश अंभोरे, गोविंद कराळे, शनिवार २० रोजी काल्याचे किर्तन व पालखी सोहळा व दिंडी मिरवणूक गाव मधून निघेल या श्रीमद् भागवत कथा चे सोहळ्याचे आयोजन संत गाडगेबाबा सेवा समिती व समस्त सावरा गाववासी यांच्याकडून पंचक्रोशीतील भावी भक्तांनी भागवत कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे सेवा समितीने आवाहन केले आहे.

## सैयद मोहसीन उर्दू हायस्कुल शिवणीमध्ये अल्पसंख्याक हक्क दिन साजरा




प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला:** यंग मुस्लिम एज्युकेशन ॲन्ड सोशल वेलफेअर सोसायटी पातुरच्या सैयद मोहसीन उर्दू हायस्कुल ॲड ज्युनियर कालेज शिवणी मध्ये अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सैयद मोहिब इकबाल होते. तर प्रमुख अतिथी माजी पंचायत समिती सदस्य शेख साबीर शेख मुसा व एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पीएसआय दयाराम राठोड, जिप उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जाकीर खान ताहेर खान होते.

अल्पसंख्याक दिनानिमित्त शालेय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर मेकींग व निबंध स्पर्धा घेण्यात आली. य शाळेचे सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्त्व सांगितले. अल्पसंख्याक हक्क दिन १८ डिसेंबर रोजी देशात साजरा केला जातो. भारतीय राज्यघटनेनुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले पाहिजेत. मग ती कोणतीही जात,धर्म,भाषा किंवा समुदाय असो. देशाच्या संविधानात अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची तरतूदही आहे. जाकीर खान यांनी विद्यार्थ्यांना अलपसंख्याक दिन बाबत माहिती दिली. आयशा खान, सना अंजुम, अब्दुल नइम या विद्यार्थ्यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन मोहमद अनवारोदीन यांनी केले तर आभार प्रदर्शन शमशेर खान यांनी केले. मोहम्मद जाहिद, काजी मोइनोदीन, अजमतुलाह खान, मो. फारुख अब्दुल शकुर, सैयद वसीम यांनी आयोजनाची बाजू सांभाळली.

## निलेश कापकर यांच्या मार्फत बेरोजगार युवक - युवतींना कौशल्य प्रशिक्षण



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**आलेगाव:** सेवा है पुण्य कर्म, समिधा संग हम जले.....या पंक्ती प्रमाणे निलेश कापकर यांचे आलेगाव परिसरात काम सुरू आहे. त्यांच्या पुढाकाराने गोरगरीब शेतमजूर महिलांना पंजाबराव कृषी विद्यापीठ येथे विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याचे सरकारी प्रमाणपत्र सुध्दा वाटप करण्यात आले आहे. आलेगाव मध्ये तसेच जवळपासच्या भागातच ग्रामीण बेरोजगार महिला पुरुषांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे. हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. कारण ग्रामीण भागातील बेरोजगार कामगारांची शहरी भागात गेल्या नंतर मोठ्या प्रमाणात पिळवणूक होते. त्यांना मोठ्या प्रमाणात शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रासाला सहन करावे लागते. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना सुद्धा सामोरे जावं लागू शकते.

पुढील ५ वर्षात किमान १००० बेरोजगारांना आलेगाव परिसरातच रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊ शकलो पाहिजे. कापकर यांच्या कार्याचे आलेगाव परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. धम्मपाल इंगळे, उमा तेलगोटे, वैशाली तेलगोटे, रमाबाई तेलगोटे, माया भोजने, संघमित्रा भोजने, कविता तेलगोटे प्रशिक्षणार्थी होते.

## २० व्या राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड



प्रतिनिधी १९ डिसेंबर

**पातूर:** नंदुरबार टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन, महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन, टेनिस बॉल क्रिकेट फेडरेशन इंडियाच्या मार्गदर्शनाखाली सब ज्युनियर, ज्युनियर मुला मुलींच्या टेनिस बॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा जी. टी. पाटील महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झाल्या. त्यामध्ये टेनिस बॉल क्रिकेट जिल्हा असोसिएशन व पातुर टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. अंतिम फेरीत ठाणे जिल्हा सोबत अटीतटीच्या लढतीमध्ये उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून ६५ संघांनी सहभाग घेतला. चुरशीच्या सामन्यात मॅन ऑफ द मॅच गजानन अत्तरकार ,अमन चौहान, अक्षय खोड़े यांनी उत्तम प्रदर्शन केले. महाराष्ट्र टेनिस बॉल असोसिएशनचे अध्यक्ष मोहम्मद बाबर यांच्या हस्ते अकोला जिल्ह्याच्या खेळाडूंना उपविजेतेपदाची ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यामध्ये विजयी खेळाडू शिवम यादव, अनिकेत गायकी, ऋषिकेश राखोंडे, आर्यन पवार, निलेश गवई, निलेश खुळे, शैलेश जाधव, अरहान शेख, शर्विल जाधव, दर्शन इंगळे, पवन म्हैसने, यश खेडकर, विवेक खंडारे, शौर्य इंगळे,हे असून वरील सर्व खेळाडूंना अर्जुनसिंह गहिलोत यांचे प्रशिक्षण लाभले. आग्रा येथे एकलव्य स्पोर्ट्स स्टेडियम येथे २० ते २२ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या २० व्या राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत खेळाडूचा समावेश करण्यात आला आहे अशी माहिती अकोला जिल्ह्याचे मुख्य व महासचिव शिवाजीराव चव्हाण यांनी दिली आहे.

## गुटखा विक्री करणाऱ्या आरोपीला अटक

विशेष प्रतिनिधी १९ डिसेंबर



**कुटासा:** १८ रोजी करतवाडी गावाकडून एक इसम चोहोट्टा बाजारकडे मोटारसायकलवर प्रतिबंधीत गुटखा घेऊन येणार आहे अशी माहिती मिळाली. चोहोट्टा बाजार करतवाडी रोडवर टिपु सुलतान चौकात सापळा रचुन नाकबंदी केली. एक इसम दुचाकीवर येताना दिसला. रेल येथील शाम भाष्कर सुरतकार याने पांढ-या पोतड्यामध्ये प्रतिबंधीत तंबाखुजन्य गुटखा आढळला. ४२, ३४० रूपयांचा मुद्देमाल व यामाहा कंपनीची दुचाकी असा एकुण १०७,३४० /- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शासनाने प्रतिबंधीत केलेला मुद्देमाल विक्री करीता जवळ बाळगल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्या विरूध्द दहिहंडा पोलीस स्टेशन येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्यामध्ये आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली. पोलिस अधीकक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलिस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गोपाल ढोले व पोलिस उपनिरीक्षक सजंय इंगळे व पोलीस कर्मचारी यांनी केली.

## एम.बी. कराटे संघ गोव्यातील आंतरराष्ट्रीय निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना

प्रतिनिधी १९ डिसेंबर



**मूर्तिजापूर:** येथील एम.बी.कराटे संघ गोव्यातील मडगाव येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा निवडीसाठी रवाना झाला. एम.बी. कराटेचे संचालक व प्रमुख प्रशिक्षक सेन्सई गंगाधर जाधव, प्रशिक्षक समीर जाधव यांच्या नेतृत्वाखाली हा संघ सहभागी होत आहे. या संघात शहरातील विविध शाळेचे विद्यार्थी विनय जामनिक, आर्यन शेलोकार, आयुष जामनिक, मधुरा लोडम, यश वानखडे, त्रिभूती इंगोले, ओवी गोरले, सोहम ताडेराव, तन्मय ठाकरे, नंदनी वरोकार, रुद्रा फुके, सक्षम कडू, अंशुमन सरोदे, अक्षरा ढाकरे, प्रांजली गणवीर, अदविक शर्मा, सानवी इंगोले व राणी जाधव या विद्यार्थी कराटेपटूंचा समावेश आहे. या खेळाडूंनी यापूर्वी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळविले असून, ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळवून देणारी आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५

■ मतदारांना मतदानाचा हक्क निर्भय व निर्विघ्नपणे बजावता यावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने २० डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे निवडणूक असलेल्या सर्व ठिकाणी सार्वजनिक सुट्टी लागू राहणार आहे.

■ अखेर काही तासांतच यवतमाळ शहराचा कारभार कोणाच्या हाती जाणार, याचा फैसला होणार असून, सर्वांचे लक्ष आता मतदानाच्या दिवशी लागले आहे.



## २.३२ लाख मतदार ठरवणार सत्तेचा कौल, ५१ मतदान केंद्र संवेदनशील

# यवतमाळ नगराध्यक्ष पदासाठी नऊ तर नगरसेवकांसाठी 299 उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक शनिवारी, दि. २० डिसेंबर रोजी पार पडत आहे. नगराध्यक्ष पदासह नगरसेवकांच्या ५६ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत तब्बल २ लाख ३२ हजार ३१५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, प्रशासनाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी कडेकोट तयारी केली आहे. मतदारांना नगराध्यक्ष पदासाठी एक, प्रभागातील 'अ' जागेसाठी एक आणि 'ब' जागेसाठी एक अशी तीन मते द्यावी लागणार आहेत. प्रशासनाने सर्व मतदान केंद्रांवर सुरक्षा व प्रशासनिक तयारी पूर्ण केली असून, निवडणूक शांततापूर्ण व सुरळीत पार पडावी यासाठी कडेकोट व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी एका जागेसाठी ९ उमेदवार आणि नगरसेवकपदाच्या ५८ जागांसाठी २९९ उमेदवार मैदानात उतरले आहेत. निवडणूक प्रक्रिया शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी पार पडणार आहे.




यवतमाळ नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शहरातील २९ प्रभागांमध्ये मतदान होणार आहे. मतदारांच्या सोयीसाठी शहरात ७३ ठिकाणी एकूण २४८ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे.

यापैकी ५१ मतदान केंद्र संवेदनशील घोषित करण्यात आली असून, या ठिकाणी विशेष सुरक्षा उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

संवेदनशील केंद्रांवर पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, प्रशासनाकडून करडी नजर ठेवली जाणार आहे. या निवडणुकीत १,१६,२४५ पुरुष, १,१६,०४६ महिला आणि २४ इतर असे एकूण २,३२,३१५ मतदार मतदानासाठी सज्ज आहेत. शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये सर्वाधिक १३,१०० मतदार असून, येथे १३ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. तर प्रभाग क्रमांक १२ मध्ये सर्वात कमी ५,२९० मतदार असून, त्यांच्यासाठी ६ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी उमेदवारांनी प्रचाराचा जोर वाढवला असून, दुसरीकडे प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

मतदान केंद्रांवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुमारे १,२०० अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, मतदानाच्या दिवशी पोलिस व इतर विभागांचे मिळून सुमारे २ हजार कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात राहणार आहेत. मतदान प्रक्रिया शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. मतदारांना नगराध्यक्ष पदासाठी एक, प्रभागातील 'अ' जागेसाठी एक आणि 'ब' जागेसाठी एक अशी तीन मते देणे आवश्यक आहे.

तिन्ही मते दिल्यानंतरच मतदान प्रक्रिया पूर्ण मानली जाणार आहे. दरम्यान, यवतमाळप्रमाणेच दिग्रस, पांढरकवडा आणि वणी या नगरपालिकांतील न्यायालयीन आक्षेप असलेल्या एकूण ६ जागांसाठीही २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून, या जागांसाठी २३ उमेदवार रिंगणात आहेत.

---

## आरोप बिनबुडाचे, राजकीय द्वेषातूनच; भाजपाकडून काँग्रेसच्या 'त्या' आरोपांचा समाचार

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळमध्ये काँग्रेस नेत्यांनी केलेल्या तथाकथित आरोपांना भारतीय जनता पार्टीकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भाजपाचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी काँग्रेस नेत्या ॲड. सीमा तेलंगे यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके व भाजपाच्या नगराध्यक्ष उमेदवार ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्यावर केलेले आरोप पूर्णतः बिनबुडाचे, निराधार व राजकीय द्वेषातून प्रेरित असल्याचा आरोप केला आहे.

ॲड. सीमा तेलंगे यांनी दोन दिवसांपूर्वी व्हिडिओ प्रसिद्ध करून तसेच पत्रकार परिषद घेऊन केलेले आरोप कोणत्याही पुराव्याअभावी रिकामे ठरले असून जनतेकडून त्याला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, असे चौहान यांनी स्पष्ट केले. न्यायप्रविष्ट प्रकरणांवर अशा प्रकारचे



आरोप करणे म्हणजे न्यायालयीन प्रक्रियेचा अवमान असून, स्वतः वकील असताना अशा प्रकारचे वक्तव्य करणे अनुचित असल्याची टीकाही त्यांनी केली.

काँग्रेस पक्षाची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय असून पक्ष शेवटच्या घटका मोजत आहे, असा टोला लगावत चौहान म्हणाले, "काँग्रेसकडे आता कार्यकर्तेही शिल्लक राहिलेले नाहीत. जनाधार गमावलेले नेते केवळ प्रसिद्धीसाठी किंवा पदाच्या महत्वाकांक्षेपोटी असे केविलवाणे आरोप करत आहेत."

भाजपा ही विकासाच्या मुद्द्यांवर जनतेकडे मत मागणारी पार्टी असून वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणात गुंतत नाही, असे सांगत काँग्रेस नेत्यांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांना प्रत्युत्तर देणे भाजपाच्या संस्कारात बसत नसल्याचेही ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी स्पष्ट केले.

> ■ आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना जीवे मारण्याच्या धमकीचा उल्लेख करताना काँग्रेसने धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव, धमकीचे स्वरूप किंवा कोणताही ठोस पुरावा दिलेला नाही, याकडेही चौहान यांनी लक्ष वेधले. "स्पष्ट पुरावे आणि नाव जाहीर करा, मगच आम्ही उत्तर देऊ," असे खुले आव्हान भाजपाचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी दिले.

---

## आदिवासी मंत्री अशोक उईके यांच्यावर गंभीर आरोप

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आदिवासी शेतकऱ्यांची जमीन धमकावून हडपल्याचा आरोप करणाऱ्या पॉडकास्ट मुलाखतीनंतर व्यथित होऊन ते जीवे मारण्याच्या धमक्या देत असल्याचा गंभीर आरोप ॲड. सीमा एल. तेलंगे यांनी केला आहे. या धमक्या थेट दुसऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून येत असून, कुटुंबात दहशत पसरवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. मंत्रीपदाच्या प्रभावाने प्रशासनाला प्रभावित करून चुकीची कामे करवून घेण्याची शक्यता असल्याने हे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील देवधरी गावातील आदिवासी शेतकरी भुरबा कोवे यांची जमीन मंत्री उईके यांनी जोरजबरदस्तीने हडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. स्वतःच्या सुतगिरणीच्या नावाने तलाठ्याशी संगनमत करून ही जमीन



हस्तगत करण्यात आली. इतकेच नव्हे, उभ्या पिकात जेसीबी टाकून पिक उद्ध्वस्त करण्यात आले आणि शेतकऱ्याला मारहाणही करण्यात आली. या घटनेनंतर भुरबा कोवे यांनी वडकी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला; मात्र, तक्रार नोंदवली गेली नाही आणि त्यांना हाकलून लावण्यात आले. आजही मारहाण करणाऱ्या आरोपींवर गुन्हा दाखल झालेला नाही. या प्रकरणात न्यायालयीन लढाई सुरू असून, उईके यांनी या आरोपांवर तर्कशील उत्तर देण्याऐवजी धमक्या देण्याचा मार्ग अवलंबल्याचा दावा तेलंगे यांनी केला आहे.

आदिवासी विकास विभागातील अनियमितताही चर्चेत आल्या आहेत. १ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार (जीआर) आदिवासी आश्रमशाळांमध्ये कंत्राटी भरती बाह्य स्रोताद्वारे करण्यात आली. यात उच्च माध्यमिक इंग्रजी शिक्षक आणि प्राथमिक मराठी शिक्षकांसह १७९१ पदे भरली गेली. मात्र, यासाठी ४५०० अनुभवी कंत्राटी शिक्षकांना

> **'धमक्यांना आम्ही घाबरत नाही'**
>
> ■ 'धमक्यांना आम्ही घाबरत नाही; पण जिवाला काही झाल्यास जबाबदार कोण?' असा सवाल उपस्थित करत तेलंगे यांनी जावयाच्या मोबाइलवरून धमकी आल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाची सविस्तर माहिती त्यांनी वार्ताहरांना पुरवली असून, यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

काढून टाकण्यात आले. ही प्रक्रिया संभाजीनगर येथील एका खासगी कंपनीला देण्यात आली असून, त्यासाठी ८४ कोटी ७४ लाख ५५ हजार रुपयांचा खर्च झाला. पाळोदी आश्रमशाळेत कंत्राटी शिक्षकाने गैरव्यवहार आणि मुलींचे शोषण केल्याची तक्रार मुलींनी प्रकल्प अधिकाऱ्याकडे केली; पण कारवाई होण्याऐवजी कर्तव्यदक्ष महिला वॉर्डनची बदली करण्यात आली आणि प्रकरण दडपण्यात आले. यानंतर मुलींच्या पालकांनी शाळेतून मुली काढून घेण्यास भाग पाडले गेले. एका व्हिडिओच्या माध्यमातून हे प्रकरण सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आणि वृत्तपत्रांत बातम्या आल्यानंतरच मुख्याध्यापक आणि कंत्राटी शिक्षकावर गुन्हा दाखल झाला. बातमीदारांनाही 'बातमी छापू नका, बदनामी होईल' असे सांगण्यात आले.

दरम्यान, मंत्री उईके यांच्या मुली प्रियदर्शनी अशोक उईके यांना मुंबई उच्च न्यायालयात बी वर्ग समुपदेशक म्हणून नियुक्ती मिळवून देण्यासाठी नागपूर येथे तीन दिवसांचे आदिवासी अधिवेशन आणि मोठा मेळावा भरवण्यात आला. हे सर्व आदिवासी विकास निधीतून करण्यात आले. तसेच, यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत इतर सक्षम कार्यकर्त्यांना डावलून स्वतःच्या मुलीला भाजपकडून अध्यक्षपदाची उमेदवारी मिळवून देण्यात आली. हे सर्व मंत्रीपदाच्या गैरवापराचे उदाहरण असल्याचा आरोप तेलंगे यांनी केला आहे.

---

## सोयाबीन खरेदीसाठी नाफेडच्या जाचक अटी शिथिल करा

### आ. बाळासाहेब मांगुळकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये अतिवृष्टीमुळे सोयाबीन पीक मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत सततचा पाऊस, दाणे अपरिपक्व व बारीक राहणे, एकरी उत्पादन फक्त ३-४ क्विंटलपर्यंत मर्यादित राहणे यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल होत नाही. अशा परिस्थितीत नाफेडच्या हमीभाव खरेदी केंद्रांवर कडक गुणवत्ता निकष (FAQ) लावल्याने शेतकऱ्यांचा सोयाबीन मोठ्या प्रमाणात नाकारला जात आहे.

यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून नाफेडच्या जाचक अटी व शर्ती



तात्काळ शिथिल करण्याची आग्रही मागणी केली आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले की, सततच्या पावसामुळे पिकाची गुणवत्ता खालावली असून दाणे बारीक व अपरिपक्व आहेत. खरेदी केंद्रांवर रोज वाद निर्माण होत आहेत, कर्मचारी व शेतकऱ्यांमध्ये खटके उडत आहेत. वेअरहाऊसिंगमध्येही अडचणी येत आहेत. बाजारभाव वाढण्याऐवजी सरकारच्या आयात धोरणामुळे भाव खाली राहिले आहेत. हे धोरण शेतकऱ्यांना आत्महत्तेकडे ढकलणारे असल्याची संतप्त भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. आमदार मांगुळकर यांनी विचारलेला सवाल : "सरकारला शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करायचे नाही का?" नैसर्गिक आपत्तीचा फटका व शेतकऱ्यांची सद्यस्थिती लक्षात घेऊन हमीभाव खरेदीच्या अटींमध्ये तात्काळ शिथिलता आणावी, अशी विनंती त्यांनी केली. महाराष्ट्रात यंदा अतिवृष्टीमुळे सोयाबीनची गुणवत्ता प्रभावित झाली असून, नाफेड केंद्रांवर फक्त Fair Average Quality (FAQ) मानकांनुसारच खरेदी होत आहे. डिसेंबर १८, २०२५ पर्यंत राज्यात फक्त १.४७ लाख टन सोयाबीनची खरेदी झाली आहे, तर ४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, केंद्रांवर माल नाकारला जातो किंवा अडवणूक होते. पूर्वीच्या हंगामात (२०२४) ओलावा प्रमाण १५% पर्यंत शिथिल करण्यात आले होते, परंतु यंदा अजून अशा घोषणा झालेल्या नाहीत. राज्य सरकार तक्रारींची दखल घेत असल्याचे सांगत आहे. शेतकऱ्यांच्या या समस्येकडे सरकार लक्ष देईल व लवकरच अटी शिथिल करण्याची घोषणा होईल अशी अपेक्षा आहे.

---

## शेंबाळपिंपरी ग्रामपंचायतीत अल्पसंख्यांक हक्क दिवस

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**पुसद :** शेंबाळपिंपरी येथील गावकरी सभागृहात राष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिवस मोठ्या उत्साहात आणि सर्व धर्मीयांच्या सहभागाने साजरा करण्यात आला. हा दिवस भारतात दरवर्षी १८ डिसेंबरला साजरा केला जातो, ज्याचा उद्देश अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक समता आणि विविधतेत एकता मजबूत करणे आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक पुसद तहसीलदार माधवराव जोरावर होते. यावेळी खंडाळा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विनीत घागे, पुसद पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धीरज आडे, तालुका कृषी अधिकारी मोखाडे उपस्थित होते. विशेष मार्गदर्शक म्हणून राज्य पुरस्कारप्राप्त




उर्दू कवी गाजी असर (उमरखेड) यांनी शेरो-शायरी सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुल सिद्दीकी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनात्मक मूल्यांचा संदेश देत बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक समाजात भाईचारा व सलोखा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केल्याचे सांगितले. मान्यवरांनी अल्पसंख्यांक समाजासाठी केंद्र व राज्य शासनाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक योजनांबाबत मार्गदर्शन केले. तहसीलदार जोरावर यांनी मोबाईलवर गुगलद्वारे योजना माहिती घेण्याचे आवाहन केले. अल्पसंख्यांक समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुनील वाहूळे, शेख सरवर कुरेशी व अमीन सिद्दीकी यांचा सत्कार करण्यात आला. अब्दुर रशीद उर्दू विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी "विविधतेत एकता" या विषयावर गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच रविंद्र महल्ले यांनी, सूत्रसंचालन बापुराव कांबळे यांनी तर आभार फयाज सिद्दीकी यांनी मानले. इतर उपस्थितांमध्ये महसूल मंडळ अधिकारी गोपाळ भोरे, मंडळ कृषी अधिकारी दांडेगावकर, ग्राम महसूल अधिकारी अविनाश आडे, शिक्षण विस्तार अधिकारी टेकाळे, पोलीस पाटील प्रतिभा कांबळे, सामाजिक कार्यकर्ते रऊफोदीन सिद्दीकी, तंटामुक्त समिती अध्यक्ष गौतम वाहूळे, शेतकरी संघर्ष समिती अध्यक्ष रामकृष्ण चंदेल, माजी सरपंच लक्ष्मण कांबळे, डॉ. मोहम्मद इरफान, डॉ. प्रमोद पानपट्टे, ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया मनवर आदींचा समावेश होता.

हा कार्यक्रम यवतमाळ जिल्ह्यातील सर्वात भव्य व ऐतिहासिक साजरा मानला जातो, ज्यामुळे प्रशासकीय अधिकारी व नागरिकांनी आनंद व्यक्त केला. अल्पसंख्यांक हक्क दिवसाच्या निमित्ताने विविधतेत एकतेचा संदेश सर्वत्र पोहोचला असून, समाजात सौहार्द वाढीस लागावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## माझी हकालपट्टी कशासाठी? : संतोष ढवळे यांचा सवाल

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** शिवसेनेतून आपली हकालपट्टी झाल्याची माहिती अधिकृतरित्या नव्हे, तर हितचिंतकांमार्फत कळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त करत संतोष ढवळे यांनी पक्षनेतृत्वावर सवाल उपस्थित केला आहे. गेल्या ३५ वर्षांपासून शिवसेनेत सक्रियपणे कार्यरत असूनही कोणतेही कारण न सांगता हकालपट्टी करण्यात आल्याने आपण अस्वस्थ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ढवळे म्हणाले, शिवसेनेत पदावरून दूर करण्याची प्रक्रिया असू शकते, मात्र थेट पक्षातून काढण्याचा अधिकार कुणालाही



नाही. २०१४ व २०१९ मध्ये त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली असून, २०१९ मध्ये पक्षाच्या परवानगीने अपक्ष निवडणूक लढल्याची आठवण त्यांनी करून दिली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मला वैयक्तिकरित्या ओळखतात, त्यामुळे कारवाईपूर्वी माझी बाजू ऐकून घेतली असती, अशी अपेक्षा होती, असेही त्यांनी नमूद केले.

यवतमाळ नगर परिषद निवडणूक २०२५ दरम्यान शिवसेना-काँग्रेस युतीबाबत अनेक बैठका झाल्या. अंतिम बैठकीत युतीचा निर्णय घेऊन पत्रकार परिषद घेण्याचे आदेश शिवसेनेच्या वरिष्ठांनी दिले. त्यानुसार हॉटेल दुलीप येथे पत्रकार परिषद घेऊन युतीची अधिकृत घोषणा करण्यात आली. मात्र, अवघ्या एका रात्रीत युती तुटल्याची घोषणा करण्यात आल्याने संभ्रम निर्माण झाला, असा आरोप ढवळे यांनी केला. युती तुटल्यानंतर शिवसेनेशी एकनिष्ठ नसलेल्या उमेदवारांना उमेदवारी देण्यात आली, तर निष्ठावंत शिवसैनिकांना डावलण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. दोन निष्ठावान शिवसैनिकांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले.

> **विश्वासात घेतले नाही**
>
> ■ खासदार संजय देशमुख यांच्यावरही त्यांनी प्रश्न उपस्थित करत, युती का तोडली, याबाबत मला का विश्वासात घेतले नाही, असा सवाल केला. एका पदाधिकाऱ्याने लोकप्रतिनिधींना प्राधान्य दिले जाते, निष्ठावंतांना नाही, असे सांगत हकालपट्टीची धमकी दिल्याचा आरोपही त्यांनी केला.

> **मरेपर्यंत शिवसेनेत राहणार !**
>
> ■ "माझा लढा सर्वसामान्यांसाठी आहे. मी मरेपर्यंत शिवसेना उबाठामध्ये राहणार," असा ठाम निर्धार व्यक्त करत, ही भूमिका वैयक्तिक नाराजी नव्हे, तर आपली बाजू मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे संतोष ढवळे यांनी स्पष्ट केले.


---

## ८ हजार शासकीय कार्यालयात स्मार्ट मीटर

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**यवतमाळ :** महावितरणच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यातील ८ हजार २५९ शासकीय कार्यालयांना अत्याधुनिक स्मार्ट (टाइम ऑफ डे - टीओडी) मीटर बसवण्यात आले आहेत. हे मीटर पूर्णतः प्रमाणित व अचूक असून, ग्राहकांना मोफत बसवले जात आहेत. यामुळे वीजबिलिंग प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार असून, सरासरी बिल किंवा मीटर रीडिंग न झाल्याच्या तक्रारी शून्य होण्यास मदत होईल.

राज्यात कृषी ग्राहक वगळता सर्व वर्गवारीतील ग्राहकांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट टीओडी मीटर बसवले जात आहेत. प्राधान्याने शासकीय कार्यालये, सरकारी निवासस्थाने,



मोबाइल टॉवर, नादुरुस्त मीटर व नवीन जोडण्या यांना हे मीटर दिले जात आहेत. हे मीटर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असल्याने मीटर रीडिंग स्वयंचलित होईल. मानवी हस्तक्षेपाला थारा राहणार नाही आणि ग्राहकांना प्रत्येक महिन्याला अचूक व वेळेवर बिल मिळेल. शिवाय, मोबाइल ॲपद्वारे प्रतितास वीज वापराची माहिती मिळाल्याने ग्राहकांना आपला वापर नियंत्रित करता येईल. महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी ग्राहकांना मीटर बसवण्यास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. हे मीटर ग्राहकांना कोणताही आर्थिक भार न पडता मोफत बसवले जात असल्याने वीज वापरात कार्यक्षमता वाढेल आणि तक्रारी कमी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रात स्मार्ट मीटरचा विस्तार वेगाने सुरू असून, यवतमाळसह विदर्भातील ग्राहकांना याचा थेट फायदा होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५




## न.प. निवडणुकीत अनेकांची...

# सत्तेसाठी कुरघोडी, सुरू झाली पाडापाडी !

*** आज प्रचार थांबणार, सेटींग - मिटींग सुरू * जातीय समिकरणाची बेरीज - वजाबाकी**



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गुलाबी थंडीत वाशीम शहरातील नगर पालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तपायला सुरूवात झाली. तर ऐकेरी दुहेरी वाटणार लढत तिहेरी होत आहे . तर अनेक ठिकाणी काट्याची टक्कर होणार असून कोणाला चक्कर येणार आहे. हे २१ तारखेला कळणार आहे. वाशीममध्ये उबाठा शिवसेनेच्या रेखा सुरेश मापारी, भाजपाचे अनिल केंदळे, आमआदमी पार्टीचे सागर कोकास, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संदिप दहात्रे, वंचितचे वैभव उल्लेमाले हे मैदानात उतरले आहेत. आरोप -प्रत्यारोप करून आज प्रचार तोफा निरूप घेणार आहे. विजयासाठी उमेदवाराने कंबर कसली असून साम,दाम, दंडभेद या चतूरसुत्रीचा वापर होत आहे. खऱ्या अर्थाने सत्तेच्या कुरघोडीसाठी पाडापाडी सुरू झाली आहे. जातीय समिकरणाची बेरीज वजाबाकी करून गठ्ठा मतदान मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.




पुरोगामी मनविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातीच्या खुंट्याला बांधल्या गेली आहे. सत्तेच्या सारीपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात कास्ट फॅक्टर हा महत्वाचा समजल्या जातो, विकासाचे मुद्दे केव्हाचे हद्दपार झाले आहेत. जातीच्या आधारेच उमेदवाऱ्या दिल्या जात आहेत. त्यानुसार खेळीही राजकीय पक्ष खेळत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात थेट संघर्षासोबतच आघाडीची बिघाडी झाली. महायुतीची घडी बिघडली. युतीतीलही साथी सोबत नाही. सर्वच पक्षात गटातटात विभाजन झाले. त्या विभाजनामुळे विजयाचे नियोजन बिघडले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकांनी या पक्षातून त्या पक्षात उड्या मारल्या. तर अनेकांना उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष रिंगणात उतरले आहेत. अनेक उमेदवार पक्ष बदलत असतांना सत्तेसाठी नितीमत्ता गहान ठेवत असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

राजकारणात सत्ता महान असून या निवडणुकीत पुन्हा एकदा जातीय समिकरणच समोर येतांना दिसत आहे. विकासाचे मुद्दे हद्दपार झाले आहे, शहर भकास झाले आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या समिकरणावर राजकारण सुरू आहे. सत्तेसाठी मात्र, तडजोडीतून कुरघोडी करतांना उमेदवार दिसत आहे. जागा वाटपावरून निवडणुकीच्या खऱ्या रणसंग्रामाला सुरूवात झाली आहे. श्रेयवादाच्या व कुरघोडीच्या राजकारणात खऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र, बळी दिल्या जात असल्याचे चित्र सर्वच पक्षात निर्माण झाले आहे. वरवर ऐकेरी वाटणारी निवडणूक दुहेरी तिहेरी झाली आहे. केवळ दोन दिवस मतदानाला शिल्लक असतांना निवडणुकीत चूरस वाढली आहे. कोण सरस ठरणार, काट्याची टक्कर होणार कोणाला चक्कर येणार याकडे लक्ष लागले आहे.

आरोप -प्रत्यारोप करून आज प्रचार तोफा निरूप घेणार आहे. विजयासाठी उमेदवाराने कंबर कसली असून साम,दाम, दंडभेद या चतूरसुत्रीचा वापर होत आहे. खऱ्या अर्थाने सत्तेच्या कुरघोडीसाठी पाडापाडी सुरू झाली आहे. जातीय समिकरणाची बेरीज वजाबाकी करून गठ्ठा मतदान मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.




## थोडक्यात

### निवडणूक पार्श्वभूमीवर वाशीम जिल्ह्यात तीन दिवस दारूबंदी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार व न्यायालयीन अपिलांमुळे सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर वाशिम जिल्ह्यातील संबंधित नगरपरिषद व नगरपंचायतींच्या हद्दीत मतदान व मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस दारूबंदी लागू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ तसेच संबंधित नियमांनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून हे आदेश निर्गमित केले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या दि.४ नोव्हेंबर २०२५ च्या पत्रानुसार वाशिम, रिसोड, मंगरुळपीर, कारंजा नगरपरिषद तसेच मालेगाव नगर पंचायतीच्या सदस्यपद व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. न्यायालयीन अपिलांमुळे सुधारित कार्यक्रमानुसार वाशिम नगरपरिषद व रिसोड नगरपरिषद (प्रभाग क्र. ५-ब व १०-अ) येथे मतदान दि. २० डिसेंबर २०२५ रोजी होणार असून उर्वरित संबंधित नगरपरिषद व नगरपंचायतींची मतमोजणी दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.या पार्श्वभूमीवर मतदानापूर्वीचा दिवस शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५, मतदानाचा दिवस शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ तसेच मतमोजणीचा दिवस रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित हद्दीत सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्त्या (एफएल-१, सीएल-२, सीएल-३, एफएल-२, सीएल/एफएल/टिओडी-३ , एफएल-३, एफएल/बिआर-२ इ.) पूर्ण दिवस बंद ठेवण्यात येणार आहेत.दि. १९ व २० डिसेंबर रोजी वाशिम नगरपरिषद हद्द तसेच रिसोड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ५-ब व १०-अ येथे दारूबंदी राहील. या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुद्ध नियमांनुसार कडक कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिली आहे. नागरिक व अनुज्ञप्तीधारकांनी याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी कळविले आहे.

## नगर पालिका निवडणूकीची रणधुमाळीची...

# आज की रात, 'कत्ल की रात' !

***उद्या मतदान * प्रशासन सज्ज *कौल वाढविण्यासाठी विविध युत्त्या**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

उद्या पार पडणाऱ्या न.प. निवडणुकीच्या प्रचार तोफा थंडावल्या असल्यातरी या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज की रात कत्तल की रात समजून उमेदवार मतदारांचा कौल आपल्याकडे वाढविण्यासाठी विविध युत्त्या लढविणार असल्याचे चित्र मतदार संघात पाहावयास मिळत आहे. नगर पालिका निवडणूकीत विजयाच्या वार्डापर्यंत पोहोचण्यासाठी बहुतांश पक्षाच्या उमेदवारांनी कंबर कसली आहे. साम, दाम, दंड व भेद या चतु:सुत्रीचा वापर यासाठी करतांना दिसून येत आहे. प्रत्येक राजकीय पक्षातील नाराज कार्यकर्त्यांना आपल्याकडे खेचून आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून केल्या जात आहे. आज दि. १९ डिसेंबर रोजी प्रचार तोफा थांबणार असून खऱ्या अर्थाने मिटींग सेटींग सुरू होणार आहे.

पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातींच्या खुंट्याला बांधल्या गेली आहेत. सत्तेच्या सारिपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात 'कास्ट फॅक्टर' फार महत्वाचा असतो याचा प्रत्यय नगर पालिका निवडणुकीत पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे.

निवडणुकीचे काऊटडाउन दोन दिवस शिल्लक राहीले आहेत. आता खऱ्या अर्थाने अस्तित्वाच्या रणधुमाळीला सुरूवात झाली असून या निवडणुकीमध्ये विकासाचे मुद्दे हद्दपार झाले असून मतदारांना जातीय समिकरणाच्या मोहात अडकविण्याचा प्रयत्न उमेदवार करीत आहेत. अद्यापपर्यंत कोणत्याही उमेदवाराने आपला जाहीरनाम जाहीर केला नसल्याने निवडूण आल्यानंतर काय विकास करणार हे मात्र गुलदस्त्यात आहे. नगर पालिका निवडणूकीच्या प्रत्यक्ष भेटीगाठीच्या रणधुमाळीला आरंभ झाला असून, सर्वच प्रमुख राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी प्रत्यक्ष भेटी गाठींवर भर देवून रणरणत्या उन्हात फिरायला सुरुवात केली आहे. निवडणूकांची उलटी गिणती सुरु झाली आहे. येत्या १९ डिसेंबर




रोजी होणाऱ्या निवडणूकीसाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची तन,मन, धनासह प्रतिष्ठाही पणाला लागली आहे. एवढ्यात पक्षा बरोबरच समाजातील उमेदवाराला ही मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिल्या जात आहे. समाजाच्या गोळाबेरजेवरच या वार्डातील कौल ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषक ठासून सांगत असतांनाच समाजाशी असलेली नाळ व उमेदवारांची संख्या आणि त्यात मतांची होणारी विभागणी बरेच काही ठरविणार आहे. पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातींच्या खुंट्याला बांधल्या गेली आहेत. सत्तेच्या सारिपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात 'कास्ट फॅक्टर' फार महत्वाचा असतो याचा प्रत्यय नगर पालिका निवडणुकीत पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. नगर पालिका निवडणुकीत विजयाच्या गावापर्यंत पोहोचण्यासाठी बहुतांश पक्षाच्या उमेदवारांनी कंबर कसली आहे. साम, दाम, दंड व भेद या चतुसुत्रीचा वापरही यासाठी करण्यात येत असून, प्रत्येक राजकीय पक्षांतील नाराज कार्यकर्त्यांना आपल्याकडे खेचून तालुक्यात आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न मुरब्बी उमेदवारांकडून केला जात आहे.प्रत्यक्ष मतदानाला दोन दिवस उरले आहे. त्यामुळे उमेदवारांची धडपड वाढू लागली आहे. अशातच आपले कार्यकर्ते वाढविण्यासाठी मातब्बर उमेदवारांकडून नाराज कार्यकर्त्यांना भेटून सहकार्य करण्याची गळ घातली जात आहे. यात कार्यकर्तेसुद्धा भविष्याचा वेध घेत आणि उमेदवारांच्या विजयाची शक्यता लक्षात घेऊन आपली दिशा निश्चित करताना दिसत आहे. उमेदवारांनी वेळापत्रक आखून त्यानुसार प्रचाराला सुरुवात केली आहे. प्रत्यक्ष भेटीनंतर लोकांना समाधान मिळते, हा एक मुद्दा लक्षात घेवून सर्वांनी प्रत्यक्ष भेटीगाठी सुरु केल्या आहेत.

# रात्रभर होणार अनेक उलाढाली !

## 'वोट 'साठी चालणार 'नोट' '...






● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

न.प. निवडणुकीसाठी सोमवार रात्री अनेक उलाढाली होणार आहेत. गठ्ठा मतदान खरेदी करण्यासाठी उमेदवारांनी रणनिती आखून मतदार खरेदी केल्याची चर्चा आहे. निवडणुकीसाठी उमेदवारांनी जिवाचे रान केले. सोमवार शेवटच्या दिवशी उमेदवारांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'कत्तल की रात'ठरणार आहे. रात्री अनेक उलाढाली होणार आहेत. काही ठिकाणी पैशाचा पाऊस तर काही ठिकाणी दारूचा महापूर वाहणार असल्याची माहिती आहे. ही रात्री या उमेदवारांसाठी महत्वाच्या असुन या काळात पैशांची ए.बी.सी.डी, प्रतीस्पर्धी उमेदवाराच्या गोटातील महत्वांच्या व्यक्तींना आपल्या तंबूत आणण्यासाठी पेट्यांची देवान घेवान या गोष्टी या काळात झाल्या असल्याचे माहिती आहे. यासोबतच मद्य , मटन आणि येन केन प्रकारे निवडूण येण्यासाठी वेळ पडल्यास मदीराक्षी पोहचवून कार्यकर्त्यांना खुश करण्याचे नियोजन उमेदवारांचे विश्वासु कार्यकर्ते करण्यात गुंतले असल्याचे सर्वदूर चित्र होते. याकाळात शेकडो बोकडांचे, हजारो कोंबड्यांचे बळी गेले आहेत. यासोबतच मद्याचा महापूर ही ग्रामीण भागातून महापूर वाहला असल्याचे उघडपणे दिसून आले. ऐरवी प्रचार सभेत आपल्याला निवडून दिल्यास आपल्या भागात विकासाची गंगा आणू अशी भाषा बोलणाऱ्यांनी प्रत्यक्षात सद्यातरी मद्याचा महापूर ग्रामीण भागात पोहचविण्याची तजविज केल्याचे चित्र आहे.

संभाव्य गोष्टी लक्षात घेवून पोलिस प्रशासनही सज्ज झाले असुन बेकायदेशीर दारु नेणाऱ्यांवर करडी नजर ठेवून त्यांचेवर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश जिल्हा पोलिस अधिक्षाकांकडून सर्व ठाणेदारांना मिळाले आहेत. त्यानुसार काल निवडणुकीसाठी जाणारी दारु पकडण्यात आली. परंतु छुप्या पध्दतीने हा प्रकार सुरूच आहे.

आज प्रत्यक्ष मतदानाला सुरूवात झाली असून पैशाचे व दारूचे मटणाचे अमिष देवून मतदाराला भुलविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

**शेकडो बोकडे, हजारो कोंबडे बळी, दारूचा महापूर**

# अंतिम टप्प्यात प्रचार; उमेदवार, कार्यकर्त्यांच्या पायाला भिंगरी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

न.प. निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघ्या आजचा दिवस शिल्लक आहे. वेळ कमी व काम जास्त असल्याने उमेदवाराच्या पायाला भिंगरी लावून मतदार संघात फिरत आहेत.

न.प.च्या निवडणूक जाहीर झाल्यानंतर केवळ १० दिवसाचा कालावधी प्रचारासाठी मिळाला. कमी वेळेत अधिकाधिक मतदारसंघापर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी प्रचार यंत्रणा गतिमान केली. घरोघरी निवडणूक चिन्ह पोचविण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला. पक्षातील मोठ्या नेत्यांची प्रचार सभा मोटर सायकल रॅली कॉर्नर सभा, बैठका विविध समाज घटकातील नागरिकांच्या भेटी घेण्यात आल्या. प्रचार रथ ध्वनि प्रेक्षक बॅनर जाहीरनामा या माध्यमातून उमेदवारांनी प्रचार केला. इतरांपेक्षा आम्ही कसे चांगले आहोत हे पटवून देण्यासाठी जोरदार प्रचार यंत्रणा राबविण्यात आली. प्रचारांमध्ये समाज माध्यमाचाही वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला. राजकीय पक्षाच्या नेत्यांनी घेतलेल्या सभा. बैठकामध्ये एकमेकावर आरोप करण्यात आले. प्रचारांमध्ये एअर बलून डिजिटल प्रचार यंत्रणेला प्राधान्य देण्यात आले. उमेदवारांनी रात्री दिवस एक करत निवडणुकीच्या प्रचार



केला. आता प्रचारासाठी शेवटचे दोन दिवसात उमेदवाराकडून लक्ष्मीअशास्त्रसह इतर बाबीचा ही उपयोग होणार असल्याचे दिसत आहे. नातेवाईकांच्या गाठीभेटी न.प. निवडणुकीच्या आराखड्यात उतरलेल्या उमेदवारांनी नातेवाईकांची आठवण येत आहे. एक गठ्ठा मतदानासाठी उमेदवार वेगवेगळ्या वार्डावार्डात नातेवाईकांना साकडे घालत आहेत. मतदारांना मतदानस्वरूपी आशीर्वाद आपल्याच पाठीशी ठेवावा अशी विनंती करत आहे. मतदार देखील प्रचारासाठी येणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला नाराज करताना दिसत नाही. आम्ही तुमच्याच पाठीशी असल्याचे आश्वासन मतदाराकडून उमेदवारांना देण्यात येत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


# बाळापूर न.प. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज !

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**बाळापूर :** नगर परिषद निवडणुकीकरिता २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून, याकरिता प्रशासन सज्ज असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी निखिल खेमणार यांनी दिली आहे.

२० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेकरिता ईव्हीएम यंत्रांची चाचणी करून सीलिंग प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे करण्यात आली आहे. कुठल्याही संशयाला वाव न देता मतदान प्रक्रिया विश्वासार्ह, सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. पालिका क्षेत्रा ४३ मतदान केंद्रांमधून मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी शहरातील ४० हजार ५७२ मतदार असून, त्यामध्ये २० हजार ३५९ पुरुष तर २० हजार

## ४३ केंद्रांमधून होणार मतदान




२१३ महिला मतदारांचा समावेश आहे. बाळापूर पालिका अध्यक्षपदाकरिता ५ उमेदवार तर १२ प्रभागातील २५ सदस्यांकरिता ८५ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी वैभव फरतारे, पालिका मुख्याधिकारी अभिषेक परदेशी, नायब तहसीलदार डॉ. सागर भागवत उपस्थित होते. मतदान यंत्र सिलिंग प्रक्रियेच्या वेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

## बाळापूर पोलिसांनी काढला रूट मार्च

◆ २० डिसेंबर रोजी होणाऱ्या नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी पोलीस विभाग सज्ज झाला आहे. यावेळी बाळापूर पोलिसांनी अकोला पारस रोडवरील नवीन पोलीस ठाण्यापासून रूट मार्च काढण्यात आला. जयस्तंभचौक, अंजुमन बाजार, अंजुमन रोड, गुजराती पुरा, स्टेट बँक रोड आणि बस स्टँडसह शहरातील प्रमुख रस्त्यांवरून पथसंचलन केले. या रूट मार्चचे नेतृत्व विभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, बाळापूर पोलीस निरीक्षक प्रकाश झोडगे आणि पीएसआय हिवाळे यांनी केले. तसेच आरसीपी पथक, पोलीस विभाग, होमगार्ड, वाहतूक पोलिस विभाग यांचाही सहभाग होता.






२५ डिसेंबर रोजी नाताळ सण साजरा केला जाणार आहे. यासाठी शहरात अलायन्स चर्चसह विविध भागातील चर्चचे सुशोभिकरण तसेच रोषणाई करण्यात आली आहे. ख्रिस्ती बांधवांचा सर्वात मोठा सण साजरा करण्यासाठी तयारी सुरु केली आहे.

# शुभमंगल कार्यालयात 20 व 21 डिसेंबर रोजी पुष्प प्रदर्शनी

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला :** २० व २१ डिसेंबर ला दोन दिवसीय पुष्पप्रदर्शन अकोल्यातील गोरक्षण रोडवरील शुभमंगल कार्यालयात सर्वांकरीता खुले असून, अकोला गार्डन क्लब व महाबीज च्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. निसर्गप्रेमी व पुष्प प्रेमी नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असं आवाहन अकोला गार्डन क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा यांनी केलं आहे.

अकोला गार्डन क्लब ही संस्था मागील ५१ वर्षापासून पुष्पप्रदर्शनाचे भव्य दिव्य असे आयोजन करत असते. यंदा या संस्थेचं हे ५२ वे वर्ष असून, इथे १००० पेक्षा जास्त फुल व झाडांच्या जाती व प्रकार अकोलेकरांना बघायला मिळणार आहे. सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत सर्वांसाठी हे प्रदर्शन सुरू असेल . शालेय विद्यार्थी सुद्धा या प्रदर्शनीला भेट देऊ शकतात. यंदाच्या प्रदर्शनात महिला व




मुलांकरता विविध गेम शो चे सुद्धा आयोजन गार्डन क्लबच्या महिला विंग तर्फे कारण्यात आले आहे. त्याचप्रमाणे फूड स्टॉल सुद्धा तिथे उपलब्ध असतील, तसेच घरगुती गार्डन करिता लागणाऱ्या साहित्याचे व शोभिवंत फुलझडाचे स्टॉल विक्रीकरिता तिथे उपलब्ध असतील. अशी माहिती गार्डन क्लब तर्फे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये जेष्ठ पर्यावरण तज्ञ शरद कोकाटे यांनी दिली. गुलाब व शेवंती शिवाय इतरही नवनवीन फुल यंदाच्या प्रदर्शनीचे आकर्षण असणार आहे. सोबतच विविध प्रकारचे बोन्साय व आकर्षक झाड सुद्धा बघायला मिळतील. गुलाबांच्या फुलांच्या विविध रंगबिरंगी छटा या प्रदर्शनीत अकोलेकरांना बघायला मिळतील. याशिवाय औषधी गुणधर्म असणाऱ्या झाडांचे सुद्धा एक विशेष दालन इथे उपलब्ध असेल.

२० रोजी सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन होणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून महाबीज च्या व्यवस्थापकीय संचालक एस. भुवनेश्वरी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर हे प्रदर्शन नागरिकांसाठी सुरू असणार आहे. अकोलेकरांनी या पुष्प प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असं आवाहन गार्डन क्लबचे सचिव श्याम गोटफोडे, माजी अध्यक्ष अजय सेंगर व अकोला गार्डन क्लबच्या इतर पदाधिकाऱ्यांनी केलं आहे.

# महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांचा संप स्थगित

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला :** महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईसह विविध प्रलंबित मागण्यांवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांनी संप तुर्तास मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. निलंबित कर्मचाऱ्यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार तीन दिवसांत स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात येणार असून, त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले. मंत्रालयातील महसूलमंत्र्यांच्या दालनात राज्यातील विविध महसूल अधिकारी व कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक झाली. बैठकीत एकूण १३ मुद्यांवर विचारविनिमय करण्यात आला. चर्चेनंतर महसूलमंत्र्यांनी दाखविलेल्या सकारात्मकते बद्दल समाधान व्यक्त करीत संघटनांनी आंदोलन तूर्त मागे घेण्याची घोषणा केली. बैठकीला महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघाशी संलग्न संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान बावनकुळे यांनी महसूल व भूमिअभिलेख विभागाचा नवा आकृतीबंध लवकरच तयार करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. ग्रेड-पेच्या प्रश्नावर शासन सकारात्मक असून, तलाठी संवर्गातून परीक्षेच्या माध्यमातून नायब तहसीलदारांची पदे भरण्याबाबतही अनुकूल भूमिका दर्शविण्यात आली. आंदोलन काळातील पगार न काण्याबाबतही सकारात्मकता दाखविण्यात आली. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारे व जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यावेळी उपस्थित होते. ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक चुकीची कामे केली आहेत, त्यांना माफी दिली जाणार नाही, मात्र अना झालेल्या चुका एकवेळ माफ केल्या जाऊ शकतात, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले, या बाबतची माहिती राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हा सचिव, महसूल कर्मचारी संघटना, महाराष?ट्र राज?य चे संतोष कुटे, महसूल कर्मचारी संघटना, अकोला जिल्हा अध्यक्ष वैजनाथ कोरकणे तसेच अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे तालुकाध्यक्ष, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, तसेच सर्व संघटनांचे पदाधिकारी व सदस्य यांनी दिली.

# भाजप, काँग्रेस, वंचित व मनसेकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती !

प्रतिनिधी १९ डिसेंबर

## ♦ राजकीय पक्षांचे पक्षश्रेष्ठी अकोल्यात डेरे दाखल

**अकोला :** राज्य निवडणूक आयोगाने अकोला महापालिकेसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीची आदर्श आचारसंहिता जारी केली आहे. त्या अनुषंगाने अकोल्यात भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राजकीय पक्षांकडून महापालिका निवडणूक लढविणारे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्याचा कार्यक्रम सुरू आहे.

त्या अनुषंगाने सदर पक्ष कार्यालयात पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महापालिका निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची भाऊगर्दी होऊ लागली आहे. महापालिका निवडणुकीची घोषणा झाली असून, त्या अनुषंगाने १५ जानेवारीला मतदान प्रक्रिया होणार आहे, तर १६ जानेवारी रोजी याच निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्या अनुषंगाने अकोल्यात राजकीय घडामोडींना वेग आला असून, भारतीय जनता पक्ष व काँग्रेस पक्षाने त्यांच्या पक्ष कार्यालयात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. भारतीय जनता पक्षातर्फे महापालिकेची निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांची यादी पक्षश्रेष्ठींकडे सादर करण्यात आल्याची माहिती आहे. तसेच अकोला महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महायुतीकडे तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या राजकीय पक्षांची महाविकास आघाडी कधी होते, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.





आरआरसी नेटवर्कचे संस्थापक संचालक प्रदीप उपाख्य बंडूभाऊ देशमुख हे वाढदिवशी अकोला येथील आरआरसीचे केबल ऑपरेटर्स तसेच यवतमाळ येथील प्रतिनिधींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# आखतवाडा येथे लोकसहभागातून वनराई बंधारा



**अकोला :** 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत मौजे आखतवाडा येथे ग्रामस्थांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची यशस्वी उभारणी केली आहे. या उपक्रमामुळे गावातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, शेतीसाठी भेडसावणारे पाण्याचे संकट कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे व या उपक्रमातून इतर गावांनाही प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

जलसंधारणाच्या या महत्त्वपूर्ण कामात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दुष्काळसदृश परिस्थितीत पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी हा वनराई बंधारा उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाला कृषी विभागाचे तांत्रिक मार्गदर्शन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींचे सहकार्य लाभले. या वेळी शेतकरी रामेश्वर चिपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विभागाकडून उप विभागीय कृषी अधिकारी विवेक बिऱ्हाडे , तालुका कृषी अधिकारी वाशीमकर ,मंडळ कृषी अधिकारी बेले , तालुक्यातील उप कृषी अधिकारी देशमुख , सहायक कृषी अधिकारी वानखडे , वाकोडे , हिवाळे, बंड , बोळे , घाटोळ,सौ राऊत , सौ अटंमबर यांनी बंधाऱ्याच्या उभारणीसाठी तांत्रिक मार्गदर्शन केले.

# तेली समाज श्री राठोड पंच मंडळाकडून आरोग्य शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी १९ डिसेंबर

## ♦ शेकडो रुग्णांनी घेतला शिबिराचा लाभ

**अकोला :** तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून शहरातील डाबकी रोड परिसरातील राठोड पंच बंगला येथे भव्य आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तेली समाज श्री राठोड पंच मंडळ, अकोला आणि स्कायलार्क हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. विशेष म्हणजे, हजारो रुपयांच्या तपासण्या या शिबिरात केवळ ५० रुपयांत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून राज्य तेली समाज समन्वय समिती, मुंबईचे अध्यक्ष तथा तेली समाज श्री राठोड पंच बंगला, अकोलाचे अध्यक्ष प्रकाश डवले सर उपस्थित होते. याप्रवेळी राजेंद्र गोतमारे, मनोज वानखेडे, गजानन बोरले, बालमुकुंद बीरन, रमेश गोतमारे, सुधाकर झापर्डे, विष्णुपंत मेंहरे, प्रकाशभाऊ फाटे, दिलीप नायसे, ललित भगत, गोपाल राऊत, संजय वानखेडे, मदन



भिरड, देवेंद्र भिरड, विजय वानखेडे, केशव साकरकर, राजेश पातले, निलेश कपले, राम भीरड, अरविंद भिरड, अमर भागवत, गणेश निवने, प्रमोद चोपडे, प्रवीण झापर्डे, विकास राठोड, पवन मेहसरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश पूजन, श्री गजानन महाराज आणि श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने करण्यात आली.विविध रोगांवर मोफत मार्गदर्शन व तपासणी या शिबिरात हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, गुडघेदुखी, कंबरदुखी, अस्थिरोग, शरीरातील गाठी, कर्करोग तपासणी, मेंदूशी संबंधित आजार, त्वचा रोग, पोटाचे विकार, फुफ्फुसांची तपासणी, हर्निया, अपेंडिक्स, मुतखडा, भगंदर, मानसिक आजार आणि व्यसनमुक्तीबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच संगणकाद्वारे नेत्र तपासणी आणि दुर्बिणीद्वारे विनाटाका शस्त्रक्रियेबाबत रुग्णांना माहिती देऊन तपासणी करण्यात आली.या शिबिरात डॉ. प्रशांत जानोरकर, डॉ. विवेक अंभोरे, डॉ. आशिष राऊत, डॉ. अशोक गुल्हाने, डॉ. नवनीत अग्रवाल, डॉ. आशिष ताले, डॉ. कोमल अंभोरे, डॉ. पत्रलेखा गुल्हाने, डॉ. स्वप्निल करवंदे, डॉ. राकेश बजाज, डॉ. अभिजीत जवंजाल, डॉ. सागर भंबेरे, डॉ. गजानन भगत, डॉ. शत्रुघ्न जाधव, डॉ. वैभव गमे, डॉ. राहुल उगले, डॉ. तेजस उगले, डॉ. मयूर अग्रवाल, डॉ. स्वास्तिक नाकडे आणि डॉ. अभिजीत ढवले यांनी आपली सेवा दिली. शेकडो रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला असून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 200 वर्षा पासून भरते मूर्तिजापूरात यल्लामा मातेची यात्रा

प्रतिक कुऱ्हेकर १९ डिसेंबर

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर नगराचे ग्रामदैवत तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि गोवा आदी राज्यातील लाखो भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या सर्व दूर ख्याती असलेल्या श्री यल्लमा देवीच्या यात्रेला सुरुवात झाली आहे. यामुळे मूर्तिजापूर येथील स्टेशन विभागातील चिखली गेट रोड वर असलेल्या यल्लमा मातेच्या मंदिरात भाविक याठिकाणी आता दर्शनासाठी आणि आपला नवस फेडण्यासाठी दाखल होत आहेत. पहिल्याच दिवशी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केलीये. यल्लामा माता जन्म उत्साव निमित्त मंदिरावर केलेली विद्युत रोषणाईने भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. मूर्तिजापूर येथील यल्लामा माते च असलेलं

## विदर्भातील पहिले प्राचीन मंदिर




मंदिर प्राचीन असून महाराष्ट्रातील दुसरं तर विदर्भातील पाहिलं मंदिर आहे. महाराष्ट्रत धुळे आणि मूर्तिजापूर येथे च यल्लामा मातेच मंदिर असुन मूर्तिजापूर च्या मंदिराची अंदाजे २०० वर्षा पूर्वी संतू मराठा (होटे) यांनी स्थापना केल्याची सांगण्यात येते. नेहमीच आपल्या शरीरावरसाज चढवत, शृंगार करत फिरणारे हे जोगते (तृतीय पंथी) विविध रंगाचे आकर्षक वेशभूषा आणि लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने परिधान करून यल्लामा देवीच्या यात्रेला आवर्जून उपस्थित राहतात तर हा त्यांचा व यलमार समाजाचा सर्वात मोठा उत्सव असतो. मार्गशिष महिन्यात द्वादशी ला यल्लामा मातेचा जन्म दिवस म्हणून साजरा करतात ही यात्रा उत्सव त्रयोदाशी पर्यंत दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते.

कमरेला लिंबाचा पाला बांधून अंगाला ओली हळद लावून गुरु घर मानल्या जाणाऱ्या मुर्तीजापुर येथील दिलीप होटे यांच्या घरून यल्लमा माता मंदिर येथे येण्याची परंपरा आजही २०० वर्षांपासून अविरत सुरुये. पूजा अर्चा करून मध्यरात्री द्वादशीला १२ ते १ वाजता च्या दरम्यान महाआरती करण्यात येते. दुसऱ्या दिवशी यल्लमा मातेची नगर प्रदक्षिणा काढण्यात येते. मिरवणुकीच्या शेवटी भक्तांच्या घरी पूजा अर्चा झाल्यावर जळत्या निखरावरून यल्लमा देवीचा जग घेऊन चालण्याचे ही परंपरा आजही चालत आहे.

# जिल्हा ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ

प्रतिनिधी १९ डिसेंबर

**अकोला :** यंदा जिल्ह्याला शासनाने ८२ लक्ष रू. ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट दिले आहे. देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याचे महान कार्य करणा-या शूर सैनिकांप्रती कृतज्ञता म्हणून जिल्ह्यात उद्दिष्टाहून अधिक निधी संकलित होण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निमित्त ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी मीना यांच्या हस्ते माजी सैनिक वसतिगृहात झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. समितीचे सदस्य जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, उपशिक्षणाधिकारी जितेंद्रकुमार प्रधान, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर आदी यावेळी उपस्थित होते.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK